रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक ११ ▌पृष्ठ ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, सोमवार, दि. १७ जून २०२४

किंमत ४ ₹


## पावसाची वाटचाल मंदावली!

**पुणे** : मॉन्सून दोन दिवसांपासून अमरावती, चंद्रपूर भागातच मुक्कामी आहे. त्याची पुढची वाटचाल मंदावलेली आहे. आतापर्यंत मॉन्सूनने संपूर्ण कोकण, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये मजल मारली आहे. परंतु, दोन दिवसांपासून मॉन्सूनमध्ये प्रगती झालेली दिसत नाही. अजून तीन-चार दिवस तरी प्रतीक्षा करावी लागेल, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, सातारा, सिंधुदुर्ग, रायगड या घाट विभागात वादळवाऱ्यासह पावसाचा इशारा दिल्याने येलो अलर्ट देण्यात आला आहे. सध्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी विदर्भातील अमरावती आणि चंद्रपूर पर्यंतच्या भागापर्यंत मजल मारलेली आहे. पण त्यानंतर मॉन्सूनची चाल मंदावलेली पाहायला मिळत आहे.

## ईव्हीएमवर 'मस्क' यांचा संशय

**नवी दिल्ली** : टेस्लाचे आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्म साईटचे मालक एलॉन मस्क यांनी ईव्हीएमला हद्दपार करण्याची मागणी केल्यानंतर सर्वाधिक पडसाद भारतात उमटले आहेत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी पुन्हा ईव्हीएमवर प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी महाराष्ट्रात सर्वाधिक वादग्रस्त ठरलेल्या रवींद्र वायकर निकालाचा मुद्दा उपस्थित केला आहे. माजी केंद्रीय मंत्री राजीव चंद्रशेखर यांनी मस्क यांच्या ईव्हीएमबाबतच्या पोस्टवर प्रतिक्रिया दिली असून ईव्हीएमचा वापर पूर्णपणे सुरक्षित असल्याचे म्हटले आहे. मस्क यांनी माणसांकडून किंवा एवनद्वारे हॅक होण्याचा धोका आहे, जरी हा धोका लहान असला तरी तो खूप जास्त असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

**आजचा अग्रलेख**

**निर्धार आणि आव्हान**

## वेधक

### गंगा नदीत बोट उलटली

**पाटणा** : राजधानी पाटणा येथील उमाशंकर घाटात आज (रविवारी) पहाटे पाच जणांचा गंगेत बुडून मृत्यू झाला आहे. मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी सर्वजण नालंदाहून आले होते. अंत्यसंस्कारानंतर गंगेच्या पलीकडे बोटीतून स्नानासाठी जात असताना ही दुर्देवी घटना घडली आहे. एनएचएआयचे माजी प्रादेशिक अधिकारी अवधेश कुमार आणि त्यांच्या मुलासह पाच जणांचा बुडणाऱ्यांमध्ये समावेश आहे. एनडीआरएफची टीम बुडालेल्यांचा शोध घेत आहे. पाटणा डीएम सर कपिल अशोक देखील घटनास्थळी पोहोचले पान २ वर

### सलमानला जीवे मारण्याची धमकी

**मुंबई** : बॉलिवूडमधील प्रसिद्ध अभिनेता सलमान खानला२५ वर्षीय तरुणानं जीवे मारण्याची धमकी दिली आहे. बनवारीलाल लातुरलाल गुजर असं या तरुणाचं नाव असून त्यानं एका युट्यूबवर एक व्हिडीओ शेअर करुन सलम ानला जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी पोलिसांनी राजस्थानमधून या तरुणाला अटक केली आहे. मुंबईसायबरपोलिसांनी बनवारीलाल लातुरलाल गुजर या व्यक्तीविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. त्यानं अरे छोड़ो यार नावाच्या यूट्यूब चॅनेलवर व्हिडीओ शेअर केला. या व्हिडीओमध्ये त्यानं बिश्नोई गँगचा आणि सलमान खानला जीवे मारण्याच्या प्लॅनचा उल्लेख केला. मुंबई गुन्हे शाखेने आरोपी बनवारीलाल लातुरलाल गुजर याला राजस्थानच्या बोर्डा गावातून अटक केली. पुढील तपासासाठी त्याला मुंबईत घेऊन जाणार असल्याची पान २ वर



## राष्ट्रीय महामार्ग विभागाची बघ्याची भूमिका

## मुंबई-गोवा महामार्गाला दरडींचा धोका

प्रमोद जाधव

। अलिबाग ।

**सरकारच्या नाकर्तेपणामुळे मुंबई-गोवा महामार्गाचे काम संथगतीने सुरु आहे. त्याचा फटका प्रवाशांसह स्थानिकांना मोठ्या प्रमाणात बसत असताना रस्त्यासाठी लागणारे, दगड मातीसाठी पोखरलेल्या डोंगरातून दरड कोसळण्याची भीती निर्माण झाली आहे. या महामार्गाला दरडींचा धोका संभवत आहे. तरीदेखील राष्ट्रीय महामार्गाकडून बघ्याची भूमिका घेतली जात असल्याची प्रतिक्रिया नागरिकांकडून उमटत आहे.**

मुंबई-गोवा महामार्गावरील अरुंद रस्त्यामुळे अपघाताबरोबरच वाहतूक कोंडीचे संकट निर्माण झाले होते. पत्रकारांसह वेगवेगळ्या सामाजिक संस्था, संघटना व स्थानिकांनी पुढाकार घेत चौपदरीकरणाची मागणी केली. त्यानंतर महामार्गाच्या कामाला मंजुरी मिळाली. २०१० पासून या कामाला प्रत्यक्षात सुरुवात झाली. पळस्पे ते इंदापूर हा पहिला टप्पा जलदगतीने होईल, अशी अपेक्षा होती. मात्र १४ वर्षे होत आली, तरीही आजही या रस्त्याचे काम कूर्मगतीने सुरु आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या रस्त्याचे काम जलद गतीने व्हावे यासाठी अनेक वेळा सरकारकडे निवेदने देण्यात आली. मात्र, सरकारकडून फक्त आश्वासनेच दिली गेली. दरवर्षी आश्वासनाचे गाजरच दाखविण्यात आले. हे प्रश्न कायम असताना आता मुंबई -गोवा महामार्गावरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रवाशांसह पादचाऱ्यांचा जीव धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली आहे.

सुकेळी खिंड, टोळ, दासगाव खिंड, केंबुर्ली, नडगाव, चोळई, धामणदिवी ही दरडप्रवण ठिकाणे आहेत. महामार्गावर नागोठणे ते कशेडी घाट यादरम्यान ६ ते ७ ठिकाणे दरड प्रवण आहेत. महाड आणि पोलादपूर पान २ वर

> पळस्पे ते इंदापूर या ८४ किलोमीटर रस्त्यापैकी ७४ किलोमीटरच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम डिसेंबरअखेरपर्यंत पूर्ण होण्याची शक्यता आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या डोंगरातून पावसाळ्यात दरड कोसळण्याची शक्यता असल्यास त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करून तातडीने त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला जाईल.
> – यशवंत घोटकर, प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग

## एनडीए सरकार अस्थिर

### संजय राऊत यांचा दावा

। मुंबई । वृत्तसंस्था ।

लोकसभेत आता २०१४ आणि २०१९ सारखी परिस्थिती नाही. राहुल गांधी म्हणतात त्याप्रमाणे आम्ही कधीही सरकार पाडू शकतो. एनडीएचे सरकार स्थिर नाही. आमच्या मनात आले तर आम्ही आमचे बहुमत संसदेत सिद्ध करू शकतो. लोकसभा अध्यक्षांची निवड झाल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह ही जोडी नितीश कुमार तसेच चंद्रबाबू नायडू यांचा पक्ष फोडतील, असा दावा शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे.



पत्रकारांशी बोलताना संजय राऊत म्हणाले की, लोकसभा अध्यक्षपद महत्त्वाचे आहे. चंद्राबाबू नायडूंना लोकसभा अध्यक्षपदासाठी समर्थन देण्याचा विचार करु. तेलगू देसम पक्षाच्या चंद्राबाबू नायडू यांनी लोकसभेचे अध्यक्षपद मागितले आहे. तशी मागणीच त्यांनी एनडीएत सामील होण्यासाठी घातली होती, अशी माहिती मिळत आहे. हे अध्यक्षपद एनडीएला मिळाले नाही, तर चंद्राबाबू नायडू उमेदवार उभे करतील. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री हे टीडीपी पक्षात फूट पाडू शकतात. नितीश कुमार, चिराग पासवान, जयंत चौधरी यांचेही पक्ष भाजपा फोडू शकतो. कारण ज्यांचे मीठ खावे, त्यांच्यातच फोडाफोड करावी, ही भाजपाची परंपरा आहे, या शब्दांत संजय राऊत यांनी हल्लाबोल केला.

राहुल गांधी आणि आम्ही कोणत्याही क्षणी सरकार पाडू शकतो. देशाच्या जनतेने मोदींना झिडकारले आहे. नाकारले आहे. भाजपाचा पराभव केला. हुकूमशाहीचा, संविधान विरोधी कृतीचा पराभव केला. लोकसभा अध्यक्षपद हे त्या पद्धतीने निवड होणे गरजेचे आहे. पारदर्शक पान २ वर

**कोकण पदवीधर मतदार संघ निवडणूक**

## ठाणे, रायगड ठरणार टर्निंग पॉईंट

। रायगड । खास प्रतिनिधी ।

रायगड : कोकणात पदवीधर मतदारसंघाची निवडणूक २६ जूनला पार पडत आहे. एकूण दोन लाख २३ हजार २२२ मतदारांची संख्या आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील सुशिक्षित मतदारांची संख्या अधिक आहे. हे दोन मतदारसंघच निवडणुकीत टर्निंग पॉईंट ठरणार आहेत. त्यामुळे उमेदवारांनी या दोन मतदारसंघात चांगलीच फिल्डींग लावली असल्याचे दिसून येते. लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला महायुतीपेक्षा अधिक यश आल्याने साहजिकच त्यांचा विश्वास दुणावला आहे.

लोकसभा निवडणुकीची धामधूम आता संपल्यानंतर कोकण पदवीधर निवडणुकीसाठी राजकीय रणांगण तापले आहे. १३ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामध्ये खरी लढत ही भाजपाचे निरंजन डावखरे आणि काँग्रेसच्या रमेश कीर यांच्यामध्ये होणार आहे. मतदारसंघात पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांचा समावेश आहे. यंदा मतदारसंघासाठी सुमारे २ लाख २३ हजार २२२ मतदारांची नोंदणी झाली आहे. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यंदा मतदारांची संख्या तब्बल एक लाख २० हजारांनी वाढली आहे. वाढलेल्या मतदारांचा कौल कोणाला हेदेखील पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

एकूण मतदारांपैकी सर्वाधिक ठाणे जिल्ह्यातील आहेत. त्यानंतर रायगड जिल्ह्याचा नंबर लागत असून, त्या खोलोखाल पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मतदारांचा समावेश आहे. गेल्या वेळेला पान २ वर

### मतदारांचा टक्का वाढला; फायदा कोणाचा ?

**मतदारांची आकडेवारी**

पालघर– २८ हजार ९२५,
ठाणे–९८ हजार ८६०,
रायगड– ५४ हजार,
रत्नागिरी– २२ हजार ६८१,
सिंधुदुर्ग–१८ हजार ५४८
एकूण दोन लाख २३ हजार २२२

## डावखरेंनी केला पदवीधरांचा भ्रमनिरास

### निलकंठ दिवेकर यांचा आरोप



**पेण** : गेली १२ वर्ष कोकण पदवीधर मतदार संघाचे प्रतिनिधीत्व निरंजन डावखरे करत आहेत. मात्र ज्या पदवीधरांच्या मतांवर निवडून आले त्यांच्यासाठी आजपर्यंत काय केले? असा सवाल शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते तथा पेण पंचायत समितीचे सदस्य निलकंठ दिवेकर यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना केला. पुढे दिवेकर यांनी सांगितले की, गेल्या १२ वर्षात निरंजन डावखरे यांनी फक्त खुर्चीचा उपभोग घ्यायचे काम केले. विधिमंडळातील जुनी भाषण आपण पाहिली तर एक वेळाही निरंजन डावखरे हे पदवीधरांसाठी काहीही बोललेले आठवत नाहीत. पहिल्या वेळेला राष्ट्रवादी काँग्रेसमधून पान २ वर

## प्रचारात स्वतःला झोकून द्या

। पनवेल । वार्ताहर।




■ **माजी आमदार बाळाराम पाटील यांचे आवाहन**

■ **महाविकास आघाडीचा पनवेलमध्ये शानदार मेळावा**

लढायचं आणि जिंकायचं या ईर्षेने पुढचे नऊ दिवस प्रचारात झोकून द्या, असे आवाहन शेकापचे माजी आमदार बाळाराम पाटील यांनी केले.

येत्या २६ जून रोजी महाराष्ट्र राज्याच्या विधान परिषदेच्या कोकण पदवीधर मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार रमेश कीर हे निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या प्रचारार्थ पनवेल-उरण महाविकास आघाडीच्यावतीने पनवेलच्या ज्येष्ठ नागरिक सभागृहामध्ये रविवार दिनांक १६ जून रोजी भव्य मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या प्रसंगी ते बोलत होते.

आपल्या आघाडीत कुणीही लहान भाऊ नाही, कुणीही मोठा भाऊ नाही. आपण सगळे एक समान आहोत, असे प्रतिपादन पनवेल-उरण महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबन पाटील यांनी केले. पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष सुदाम पाटील म्हणाले की, तब्बल सहा टर्म म्हणजेच ३६ वर्षानंतर काँग्रेस पक्षाचा उमेदवार ही निवडणूक लढवत आहे. असे असले तरी रमेश कीर महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आहेत. पनवेलमध्ये पान २ वर

## विधानसभेसाठी पवारांचे चक्रव्यूह

। मुंबई । वृत्तसंस्था।

राज्यातील आगामी विधानसभा निवडणूक महाविकास आघाडी एकत्रपणे लढणार हे स्पष्ट झाल्यानंतर आता शरद पवार कामाला लागले आहेत. शरद पवार यांनी आता विधानसभा निवडणुकीसाठी चक्रव्यूह रचायला सुरुवात केली आहे. त्यासाठी शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना महत्त्वाचा सांगावा धाडला आहे. येत्या दोन दिवसामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस लढवू इच्छित असलेल्या विधानसभा जागांची माहिती शरद पवार यांनी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांकडून मागवली आहे. ही माहिती मिळाल्यानंतर शरद पवार गट विधानसभेच्या किती जागांवर दावा सांगणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.



तसेच मविआतील घटकपक्ष असलेल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि काँग्रेस हे पक्ष लढवू इच्छित असलेल्या विधानसभा जागांची माहितीही शरद पवार यांनी मागवून घेतली आहे. पुढील आठवड्यात मतदार संघनिहाय माहिती आल्यानंतर लगेचच महाविकास आघाडीची एकत्रित बैठक पार पडून २८८ जागांबाबत चर्चा होणार आहे. त्यापूर्वी शरद पवार यांनी आपली जमिनीवरील सर्व यंत्रणा कामाला लावून विधानसभा मतदारसंघांच्या जागांबाबत इत्यंभूत पान २ वर

## रस्त्यातील साकव अपघाताला निमंत्रण

। रायगड । प्रतिनिधी ।



■ **अलिबाग रोहा मुरूड रस्त्याकडे सा.बां. विभागाचे दुर्लक्ष**

■ **रस्त्यातील दोन साकवांच्या डागडुजीची गरज**

अलिबाग-रोहा-मुरूड रस्त्यावरील कुरूळ आणि बेलकडेदरम्यानच्या रस्त्यात असणाऱ्या दोन लहान साकवांची पडझड झाली आहे. त्याचबरोबर या साकवांच्या दोन्ही बाजूंची साईडपट्टी खचल्याने अपघात होण्याची दाट शक्यता वाहनचालकांमधून व्यक्त केली जात आहे.

विशेष म्हणजे, याच रस्त्यावरून सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी अन्य रस्त्यांचे निरीक्षण करण्याकरिता जातात. परंतु त्यांना हे लहान साकव आणि अपघातजन्य परिस्थिती लक्षात येत नाही. याबाबत अनेकदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तक्रार करण्यात आली आहे. परंतु, असे असतानादेखील सार्वजनिक बांधकाम विभाग याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे पाहावयास मिळत आहे. हे साकव धोकादायक असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने लावलेल्या धोक्याच्या सूचनेवरून स्पष्ट होत आहे.

हा एकमेव रस्ता अलिबागकडून रोहा आणि मुरुडकडे जाण्यासाठी आहे. असे नाही तर हा रस्ता जवळचा असल्याने प्रवासी आणि पर्यटक या रस्त्याचा सर्वाधिक वापर करतात. कुरूळ गावाच्या प्रारंभापासून हा रास्ता आखूड राहिला आहे. कुरूळ गावाबाहेर पडल्यानंतर हा रस्ता रुंद होतो. परंतु रस्त्याच्या दुतर्फा असणाऱ्या साईडपट्ट्या खराब झाल्या आहेत. खराब झालेल्या साईडपट्ट्या पान २ वर

> अलिबाग ते साई असा ८६ किलोमीटरचा रस्ता 'हॅम'मधून सुरु आहे. या रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. बेलकडे आणि कुरूळदरम्यान असणाऱ्या साकवांच्या बाबतीत लवकरच काम करण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहे. अलिबाग नगरपरिषद ते बेलकडे फाट्यापर्यंतचा रस्ता लवकर सुरु करण्यात येणार आहे. यामुळे अलिबाग-रोहा-मुरूड रस्त्यावरील असणाऱ्या साकवांची नव्याने निर्मिती केली जाणार आहे.
> - राजीव डोंगरे, उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग

## मुख्यमंत्री केवळ मराठ्यांचे

### लक्ष्मण हाकेंची टीका

। जालना । वृत्तसंस्था।

जालना जिल्ह्यातील अंतरवालीच्या वेशीवर वडीगोद्री इथं ओबीसी नेते लक्ष्मण हाकेंचे बेमुदत उपोषण सुरू आहे. बेमुदत उपोषणाचा रविवारी(दि.१६) चौथा दिवस आहे. या आंदोलनाची गरज नसल्याचे मत राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडेंनी व्यक्त केलं आहे. त्यावर आता ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी तायवाडे यांच्या वक्तव्यावर पलटवार केला आहे. मुख्यमंत्री शिवरायांच्या रयतेचे नाही तर केवळ मराठ्यांचे अशी टीका लक्ष्मण हाके यांनी केली आहे.



लक्ष्मण हाके म्हणाले, ५४ लाख नोंदी खाडाखोड करून केल्या जात आहेत. ८० टक्के मराठा कुणब्यांमध्ये घातलेला आहे याची उत्तरे तायवडे यांनी द्यावीत तर मी उपोषण मागे घेईन. मुख्यमंत्री फक्त मराठा समाजाचे आहेत. कारण ते फक्त मराठा समाजाच्या आंदोलनाला वेळ देतात ओबीसीकडे ढुंकूनही पाहत नाहीत. ओबीसी आरक्षण संपवण्याचा शासन पुरस्कृत घाट आहे. मराठा मागासलेला असेल तर पुढारलेला समाज महाराष्ट्रात कोणता आहे हे मुख्यमंत्र्यांनी सांगावे. मुख्यमंत्री फक्त मराठ्यांच्या हिताची काळजी घेत आहेत. राज्य सरकारकडून घटनाद्रोह होत आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

ज्याची लायकी नाही ज्याला संविधान माहिती नाही. ज्याला मागास म्हणजे काय पान २ वर

**महामंडळाची विशेष मोहीम**

## एसटी पास मिळणार शाळेत

। रायगड । प्रतिनिधी ।

**शाळा- महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना आता एसटीचे पास थेट त्यांच्या शाळेत वितरित करण्यात येणार आहेत. तशा सूचना एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिल्या आहेत.**



नवीन वर्षाच्या पहिल्या सत्रातील शाळा आता सुरू झालेल्या आहेत. घरापासून शाळेपर्यंत जाण्यासाठी शासनाने विद्यार्थ्यांना एसटीच्या माध्यमातून ६६ टक्के सवलत दिली असून केवळ ३३ टक्के रक्कम भरून विद्यार्थ्यांना मासिक पास काढता येईल. त्याचप्रमाणे शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत बारावीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना मोफत एसटी पासचे वितरण केले जाते. यासाठी विद्यार्थी विद्यार्थिनींना एसटीच्या पास केंद्रावर जाऊन रांगेत उभा राहून पास घ्यावे लागत होते पान २ वर

### मुख्याध्यापक, प्राचार्यांसाठी सूचना

**सर्व शाळा महाविद्यालयाच्या मुख्याध्यापक व प्राचार्यांना एसटीच्या आगार व्यवस्थापकांनी पत्र देऊन आपल्या शाळेत नवीन वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थ्यांची यादी तयार ठेवण्यास सांगितले आहे. या अभिनव योजनेचा लाभ राज्यभरात शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थी- विद्यार्थिनींना होणार आहे, असा विश्वास महामंडळाला आहे.**




# आयुष्यात चिकाटी महत्त्वाची

## अतुल झेंडे यांचे प्रतिपादन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**करिअर निवडताना तो आवडीचा निवडणे गरजेचे आहे कारण त्यावर पुढील आयुष्य अवलंबून असते. त्यामुळे आयुष्यातील ध्येय निश्चित केले तर ते सोडता कामा नये. यासाठी आयुष्यात चिकाटी महत्वाची असते, असे रायगड जिल्हा अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएन व अश्विनी टीचर्स क्लासेस अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आदर्श भवन येथे विद्यार्थी गुण गौरव सोहळा कार्यक्रमादरम्यान केले.**

यावेळी व्यापीठावर जनता शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. गौतम पाटील, अलिबाग माजी उप नगराध्यक्ष सुरक्षा शाह, हरेश देशमुख, अश्विनी मेहता, रायगड असोसिएशन उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर असोसिएशन अध्यक्ष तुषार थळे, उपाध्यक्ष राकेश दर्पे, खजिनदार विवेक पाटील, सेक्रेटरी विकास पाटील, सह सचिव अमोल नाईक, कार्याध्यक्ष सुदेश माळी, अमर मढवी, विजय पाटील, निलेश दुदम, सल्लागार सुरेश खडपे, मनोज पाटील, अभी काटकर, विराज घरत, गणेश जाधव, जितू शिगवण, रमेश कांबळे, हर्ष दर्पे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी उपस्थित विद्यार्थी आणि पालक यांना संबोधित करताना अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी सांगितले की, मुलांच्या शैक्षणिक क्षेत्रात पालकांची भूमिका महत्त्वाची असते. अनेक वेळा पालक आपल्याला हवे ते क्षेत्र निवडण्यास मुलांना भाग पाडतात. परंतु, मुलांची क्षमता, कुवत आणि इच्छा यांचा विचार पालकांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. कारण मुलं जे क्षेत्र निवडतील त्यात त्यांना समाधान मिळणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे त्यांचे वैयक्तिक आणि शैक्षणिक आयुष्यात समतोल येईल. याचप्रमाणे जीवनात बदल, सकारात्मक दृष्टिकोन, नवीन गोष्टी शिकण्याची जिद्द, मेहनत, कष्ट, अपयशाशी सामोरे जाण्याची ताकत या गोष्टी मुलांमध्ये असल्या तरच त्यांचे अस्तित्व कायम राहील. आमच्या काळात असणारी शिक्षण पद्धती आणि आताची शिक्षण पद्धत ही वेगळी आहे. आज जे सत्कार स्वीकारत आहेत ते उद्या सत्कार देणारे असतात. ग्रामीण भागात मुलांमध्ये जी चिकाटी आहे ती कोणाकडे नाही. आपल्याकडे काही कमी नाही. शहरी भागातील विद्यार्थी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थी यांच्यात फरक आहे. मी शिक्षण घेतले तेव्हा तीन किलो मीटर पायी जात होतो. विद्यार्थीयांचे दहावी नंतर करियर निवडले पाहिजे, असे ही ते यावेळी बोलत होते.

सध्याच्या स्पर्धात्मक युगात शैक्षणिक क्षेत्राबरोबरच व्यावसायिक क्षेत्रामध्ये दररोज नवनवीन कोर्सेस आणि रोजगाराच्या संधींची भर पडत आहे. त्यामुळे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झालेल्या तरुणाईला पावला पावलांवर वेगवेगळ्या क्षेत्रातील रोजगाराच्या नवनवीन संधी खुणावू लागल्या आहेत. यामुळे नक्की काय करायचं? कुठे जायचं? या संभ्रमात अडकलेल्या तरुण पिढीकडून कळत नकळत बऱ्याचदा चांगल्या संधी हातातून निसटतात. पण अशा परिस्थितीत जर तरुणांनी योग्य करिअर मार्गदर्शन घेतले तर योग्यवेळी संधीचे सोने करणे त्यांच्यासाठी कठीण नाही.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विकास पाटील व आभार प्रदर्शन अमोल नाईक यांनी केले. तर, सूत्रसंचालन वेदांत कंटक यांनी केले.

# वरवणे आश्रमशाळेत प्रवेशोत्सव साजरा

**। अलिबाग । वार्ताहर ।**

पेण तालुक्यातील वरवणे येथील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय माध्यमिक आश्रमशाळेत शनिवारी (दि.१५) शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव जल्लोषात साजरा करण्यात आला. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेणच्या प्रकल्प अधिकारी शशीकला अहिरराव यांच्या मार्गदर्शनाखाली पहिला दिवस साजरा करण्याचे नियोजन करण्यात आले.

यावेळी वरवणे आश्रमशाळेत प्रवेशोत्सव या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. जयपाल पाटील हे होते. तसेच, दिनेश वाघमारे, रोहिदास पवार, लक्ष्मण निरगुडे, सदस्य, विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्याध्यापक अजित पवार यांनी शाळेत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रम तसेच शासनामार्फत विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या सोयी सुविधांबद्दल माहिती सांगितली. यावेळी नवागतांच्या स्वागतासाठी फुलांच्या पाकळ्या टाकण्यात आल्या होत्या. तसेच, शाळेत प्रवेशावेळी विद्यार्थ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. नवागतांच्या हातात फुगे देण्यात आले. विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट तयार करण्यात आला होता. तसेच, विद्यार्थ्यांनी बनविलेल्या विविध वस्तूंचे प्रदर्शन मांडण्यात आले होते.



# विमानतळ रोजगार मार्गदर्शन शिबीर

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

विमानतळ रोजगार मार्गदर्शन शिबिर पनवेलमधील व्ही. के. हायस्कूल येथे ७०० पेक्षा जास्त तरुणांच्या उपस्थितीत यशस्वीरित्या पार पडले. यावेळी उपस्थित तरुणांना सुनील गायकवाड, भूषण खैरे, सर्वेश पाटील, रुद्राश गोवारी, वसीम यांनी मार्गदर्शन केले.



यामध्ये प्रामुख्याने जॉब कोणत्या एअरलाइन्समध्ये आहेत, इंटरव्यूसाठी जाताना कसा ड्रेस कोड पहिजे, आपली कागदपत्रे कशाप्रकारे असावित, नक्की कामाचे स्वरूप काय आहे, कामाची वेळ किती तास आणि कुठल्या शिफ्ट असतात, तुमच्या आत्मविश्वासावर, बोलण्याच्या कलेवरती आणि शिक्षणावर तुमची निवड होते अशाप्रकारे मार्गदर्शन उपस्थित विद्यार्थ्यांना मिळाले. तसेच, विद्यार्थ्यांना इंग्रजी आणि हिंदी या दोन भाषेचे ज्ञान असणे महत्त्वाचे आहे. यासाठी त्यांनी विविध ऑनलाईन किंवा ऑफलाईन इंग्रजीचे कोर्से स केले तरी सुद्धा पंधरा दिवसात बोलण्या आणि समजण्या इतपत इंग्रजी शिकू शकता, असे मान्यवरांनी सांगितले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी आमदार बाळाराम पाटील, जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेचे अध्यक्ष प्रितम म्हात्रे, काशिनाथ पाटील, गोपाळ भगत, प्रीती जॉर्ज आणि सारिका भगत, देवा पाटील, बबन विश्वकर्मा हे उपस्थित होते.

> **भविष्यात आपल्या पनवेलमध्ये सुरु होणाऱ्या स्वर्गीय दि.बा. पाटील आंतरराष्ट्रीय विमानतळात आपल्या विभागातील जास्तीत जास्त तरुण नोकरीसाठी तांत्रिकदृष्ट्या सक्षम होतील त्या दृष्टीने उचललेले हे पहिले पाऊल आहे. या पुढील भविष्यात अशा प्रकारे विविध शिबीर शेतकरी कामगार पक्ष आणि जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून राबवण्याचा माझा मानस आहे.**
> **- प्रितम जनार्दन म्हात्रे, अध्यक्ष, जे.एम म्हात्रे चॅरिटेबल संस्था**

# 'सोबती' कॅन्सर विरूध्द लढणार

**। पेण । प्रतिनिधी ।**

गर्भाशयाच्या तोंडाच्या कॅन्सर विरूध्द प्रतिबंधक लस कॅम्पमध्ये १० ते १४ वयोगटातील १,५०० मुलींना सर्व्हिकल कॅन्सर प्रतिबंधक लस विनामूल्य देण्यात येणार आहेत. या प्रतिबंधक लस बाजारामध्ये खुप महाग असून सर्वसामान्य घरच्या मुलींना देणे हे पालकांना परवडण्यासारखे नाही व दिवसेंदिवस वाढणारा गर्भाशयाच्या कॅन्सरचा प्रमाण याचा विचार करून सोबती संघटना व इतर सामाजिक संघटनेच्या अथक प्रयत्नातून हा मेगा प्रोजेक्ट एचपीव्ही लसीकरण कँप हा प्रकल्प राबविला जाणार आहे. या प्रकल्पाची सुरूवात १८ जून रोजी पालकांमध्ये जनजागृती व संमती पत्रे घेउन करण्यात येईल. त्यानंतर २२ जून रोजी लस देण्याचा कार्यक्रम होईल.

# बकरी ईद निमित्त रक्तदान

**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

ईस्लाम धर्मात उच्च ध्येय सिध्द करण्यासाठी 'कुर्बानी' किंवा सर्वस्वाचा त्याग करण्याची शिकवण आहे. या त्याग आणि बलिदानाचे प्रतीक म्हणून मईद-उल-अजहाफ (बकरी ईद)चा सण साजरा केला जातो. बकरी ईद साजरी करीत असतानाच मानवता व एकात्मतेचा संदेश देण्यासाठी जिल्ह्यात रक्तदान शिबीर आयोजित केले जाते. त्याच बरोबर जिल्ह्यातील काही मुस्लिम बांधव रक्तदान करतात व शैक्षणिक साहित्याचे वाटप देखील करतात.

रायगड जिल्ह्यातील गोरेगाव येथील प्राथमिक शिक्षक नुरखाँ पठाण दरवर्षी बकरी ईद विधायक पद्धतीने साजरी करतात. बकरी ईद निमित्त एखाद्या प्राण्याची कुर्बानी देण्यापेक्षा दरवर्षी प्रमाणे या ही वर्षी आर्थिक कुर्बाणी देत त्यांच्या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना वर्षभर पुरेल एवढ्या शैक्षणिक साहित्याचे वाटप करणार आहेत. मागील पंधरा वर्षांपासून बकरी ईद निमित्त ते हा उपक्रम राबवत आहेत. तसेच मागील चार वर्षांपासून रक्तदान करून बकरी ईद साजरी करतात.



त्याच्या या विधायक कार्याला त्यांचे दोन भाऊ इब्राहिम व अल्ताफ हे देखील साथ देतात. पनवेल मधील विविध सामाजिक संस्था आयोजित आणि रोटरी ब्लड बँक यांच्या सहकार्याने बकरी ईद निमित्त रविवारी (दि.१६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन पनवेल येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.

> **सर्व धर्मियांनी धार्मिक सण हे समाजाभिमुख व मानवतावादी करणे हे धर्माचेच उन्नयन आहे. हा विचार समोर ठेवून बकरी ईद साजरी करीत असतानाच एकात्मतेचा संदेश देण्यासाठी सामाजिक संघटनांच्या माध्यमातून रक्तदान उपक्रम राबविला जातो.**
> **- महेंद्र नाईक, पदाधिकारी, महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती**

पान १ वरून

## मुंबई-गोवा महामार्गाला दरडींचा धोका

तालुक्यात दरड प्रवण क्षेत्र अधिक आहेत. या दोन तालुक्यांमध्ये दरडी कोसळण्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत. त्यामुळे या भागात दरडी रस्त्यावर येण्याची भीती अधिक आहे. दासगाव खिंडीत तर दोन्ही बाजूला कातळ फोडून रस्ता रुंद करण्यात आला आहे. त्याठिकाणीही पावसाळ्यात दरडीचा धोका संभवतो.

महामार्गाच्या रुंदीकरणासाठी येथील डोंगर पोखरण्यात आले आहेत. त्यामुळे रस्त्यालगतच्या डोंगरातील माती पावसाळ्यात खचून रस्त्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्याबरोबरच मोठे दगड, झाडे कोसळून अपघात घडू शकतात. या ठिकाणी राष्ट्रीय महामार्ग विभागाने प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने काळजी घेणे आवश्यक आहे.

## एनडीए सरकार अस्थिर

पद्धतीने उपाध्यक्ष पद हे आता कायद्याने, घटनेने विरोधी पक्षाला मिळाला हवे. आता नरेंद्र मोदींचा काय तामझाम राहिलेला नाही. एनडीए सरकार टेकूवर आहे. टेकू कधीही पडू शकतो. राहुल गांधी आणि आम्ही कोणत्या क्षणी सरकार पाडू शकतो, असे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

दरम्यान, नरेंद्र मोदी हे प्रधानमंत्री म्हणून काही दिवसाचे पाहुणे आहेत हे तुम्हाला पुन्हा पुन्हा सांगतो. माझ्या माहितीप्रमाणे भारतीय जनता पक्षाच्या संसदीय बैठकीत मोदी यांची नेतेपदी निवड झालेली नाही. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बैठकीमध्ये मोदी यांची नेतेपदी निवड झाली अशी माझी माहिती आहे. भाजपा संसदीय दलाच्या बैठकीत नेतेपदाचा प्रश्न आला असता तर वेगळा निर्णय दिसला असता. म्हणूनच एनडीए घटक पक्षाची बैठक बोलून भाजपासह त्या बैठकीमध्ये मोदींना नेता म्हणून निवडण्यात आले ही अत्यंत गंभीर गोष्ट आहे, असे राऊत म्हणाले.

## गंगा नदीत बोट उलटली

आणि घटनेची संपूर्ण माहिती घेतली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पाटण्याचे एसएसपी राजीव मिश्रा यांनी सांगितले, एकाच परिवारातील १७ जण एकाच बोटीतून प्रवास करत होते. यामधील १२ जणांना वाचवण्यात यश आले आहे. स्थानिकांसह, नावाड्यांनी त्यांना वाचवले. एसडीआरएफची टीमही घटनास्थळी पोहोचली असून गंगेत बुडालेल्या लोकांचा शोध घेण्यात आला आहे.

## सलमानला जीवे मारण्याची धमकी

माहिती मुंबई गुन्हे शाखेने दिली आहे.१४ एप्रिलच्या पहाटे मोटारसायकलवरून आलेल्या दोन व्यक्तींनी सलमान खानच्या वांद्रे भागातील निवासस्थानाबाहेर गोळीबार केला होता. या प्रकरणानंतर पोलिसांनी सलमानची सुरक्षा वाढवली होती. याप्रकरणी एकूण सहा जणांना पोलिसांनी अटक केली होती. त्यापैकी एक अनुज थापनचा मृत्यू झाला आहे. त्याने लॉकअपमध्ये गळफास लावून आत्महत्या केली, असं सांगण्यात आलं.सलमान खान हा लवकरच सिकंदर या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. त्याच्या या आगामी चित्रपटाची प्रेक्षक उत्सुकतेने वाट बघत आहेत. ए.आर. मुरुगदोस दिग्दर्शित आणि साजिद नाडियादवाला प्रस्तुत सिकंदर हा चित्रपट २०२५ च्या ईदला थिएटरमध्ये रिलीज होणार आहे.

## ठाणे, रायगड ठरणार टर्निंग पॉईंट

या मतदारसंघासाठी तिरंगी लढत झाली होती. शिवसेनेचे संजय मोरे, राष्ट्रवादी काँग्रेसचे नजीब मुल्ला आणि भाजपचे निरंजन डावखरे यांच्यात लढत झाली होती. यात निवडणुकीच्या तोंडावर राष्ट्रवादी काँग्रेसमधून भाजपात आलेले निरंजन डावखरे विजयी झाले होते. यंदा पुन्हा एकदा डावखरे यांना संधी मिळाली आहे. डावखरे यांच्याविरोधात रत्नागिरी काँग्रेसचे माजी जिल्हाध्यक्ष आणि कोकण म्हाडाचे माजी अध्यक्ष रमेश कीर हे निवडणुकीच्या रिंगणात आहेत. कोकण पदवीधर मतदारसंघ हा कायमच भाजपाकडे राहिला आहे. डावखरे हे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. तेव्हा मात्र त्यांनी विरोधी उमेदवाराला पराभवाची धूळ चारली होती. उमेदवारांनी प्रचाराची रणनीती ठरवली असून, ते कामाला लागले आहेत. महत्त्वाच्या उमेदवारांनी मतदारांना संपर्क करण्यास सुरुवात केली आहे. ठाणे आणि रायगड जिल्ह्यात मतदार अधिक असल्याने या ठिकाणी रमेश किर आणि निरंजन डावखरे यांनी लक्ष केंद्रित केले आहे.

कोकण पदधीवर मतदारसंघ निवडणुकीच्या रिंगणात रमेश श्रीधर कीर (काँग्रेस), निरंजन वसंत डावखरे (भाजपा), विश्वजीत तुळशीराम खंडारे (भिमसेना), अमोल अनंत पवार (अपक्ष), अरुण भिकन भोई (अपक्ष), अक्षय महेश म्हात्रे (अपक्ष), गोकुळ रामजी पाटील (अपक्ष), जयपाल परशुराम पाटील (अपक्ष), नागेश किसनराव निमकर (अपक्ष), प्रकाश वड्डेपल्ली (अपक्ष), मिलिंद सीताराम पाटील (अपक्ष), शैलेश अशोक वाघमारे (अपक्ष), श्रीकांत सिध्देश्वर कामुर्ती (अपक्ष) असे एकूण १३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.

## डावखरेंनी केला पदवीधरांचा भ्रमनिरास

आमदार झाले. दुसऱ्या वेळेला आपली जागा धोक्यात आलेली दिसताच त्यांनी भाजपमध्ये जाणे पसंत केले आणि तेथून आमदार झाले. स्वतःच्या स्वार्थासाठी आणि खुर्चीसाठी धडपड करणारे निरंजन डावखरे यांनी पदवीधरांची भ्रम निराशाच केली. आज तिसऱ्या वेळेलादेखील ते निवडणूक रिंगणात उतरून पदवीधरांच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे काम करीत आहेत. गेल्या १२ वर्षात पेण तालुक्यासाठी असे कोणते भरीव काम केले की, कोणती निधी वापरली याचे उत्तर देखील आमदार निरंजन डावखरे यांनी द्यावे. आता पुन्हा एकदा ते कर्तव्यपथ नावाचा कार्यअहवाल पोस्टाच्या सहाय्याने घरोघर पोहोचवत आहेत. ज्यांनी पदवीधरांसाठी काहीच केले नाही त्यांना आता मत मागण्याचा नैतिक अधिकार नाही. पेणसह रायगडच्या पदवीधरांवर जेव्हा-जेव्हा वेगवेगळया संकटांना सामोरे जावे लागले तेव्हा एकदाही निरंजन डावखरे पदवीधरांच्या मदतीला धावून आले नाहीत अथवा स्थानिक भूमिपुत्रांच्या प्रश्नासाठी विधीमंडळात एक ब्र शब्द काढला नाही अशांना आपण निवडून द्यायचे का? असा सवाल युवा नेते निलकंठ दिवेकर यांनी केला.

## प्रचारात स्वतःला झोकून द्या

साधारण वीस हजार मतदारांची नोंदणी झाली आहे. रायगड जिल्ह्यात ५४ हजार मतदार आहेत. या मेळाव्यामध्ये मंचावर उरणचे माजी आमदार मनोहर भोईर, शिवसेना जिल्हाप्रमुख शिरीष घरत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे विशेष सदस्य आर. सी. घरत, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष कमांडर कलावत, माजी राजीप अध्यक्ष ए. डी. पाटील, शेतकरी कामगार पक्षाचे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष काशिनाथ पाटील, कामगार नेत्या श्रुती म्हात्रे आदी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री केवळ मराठ्यांचे

माहिती नाही त्या माणसाच्या बेहकाव्यावर महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आणि अख्ख मंत्रिमंडळ काम करत असेल तर फुले,शाहू,आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणायला लाज वाटते. तुमचे ४८ पैकी ३२ खासदार निवडून येत असतील तर तुम्ही मागास कसे? जरांगे मॅनेज आंदोलन करतो १०० कोटीची भाषा बोलतो. मागासवर्गाच्या अन्नामध्ये माती कालवण्याचे काम जरांगे आणि मराठ्यांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे करत आहेत. सकाळपासून मी पाण्याचा त्याग केला आहे. मुख्यमंत्री शिवाजी महाराजांच्या रयतेचा नसून फक्त मराठा जातीचा असा माझा आरोप आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही याची सरकारने लेखी आश्वासन द्यावे या मागणीसाठी वडीगोद्री येथे ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके आणि त्यांचे सहकारी नवनाथ वाघमारे यांचे उपोषण सुरू आहे. उपोषणाचा आजचा चौथा दिवस असून चौथ्या दिवशी लक्ष्मण हाके आणि नवनाथ वाघमारे यांनी पाण्याचा त्याग केला आहे. सरकार ओबीसी बाबत गंभीर नसून, सरकारच्या लेखी आश्वासनाशिवाय आजपासून आपण पाणीदेखील घेणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

## विधानसभेसाठी पवारांचे चक्रव्यूह

माहिती गोळा करायला सुरुवात केली आहे. ही माहिती हाती आल्यानंतर शरद पवार विधानसभा निवडणुकीसाठी रणनीती आखतील. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला नेत्रदीपक यश मिळाले होते. मविआने राज्यातील ४८ लोकसभा मतदारसंघांपैकी ३० जागांवर विजय मिळवला होता. शरद पवार यांच्या पक्षाने एकूण १० जागा लढवल्या होत्या. त्यापैकी ८ जागांवर शरद पवार गटाचे उमेदवार विजयी झाले तर सातारा लोकसभा मतदारसंघात राष्ट्रवादीच्या शशिकांत शिंदे यांचा निसटता पराभव झाला होता. शरद पवार गटाचा ८० टक्क्यांचा स्ट्राईक रेट ही पक्षासाठी जमेची बाजू मानली जात आहे.

लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही शरद पवार यांचा अनुभव ही मविआसाठी जमेची बाजू ठरु शकते. लोकसभा निवडणुकीत उमेदवारांच्या निवडीपासून ते प्रचाराच्या रणनीतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नियोजन अचूक ठरले होते. शरद पवार यांनी लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यानंतरच मविआला ३० पेक्षा अधिक जागांवर विजय मिळेल, असे भाकीत केले होते. हे भाकीत जवळपास खरे ठरले आहे. लोकसभा निकालाची पुनरावृत्ती विधानसभा निवडणुकीत निश्चितपणे होईल आणि राज्यात सत्ताबदल अटळ असल्याचा ठाम विश्वास शरद पवार यांनी मविआच्या संयुक्त पत्रकार परिषदेत व्यक्त केला होता.

## रस्त्यातील साकव अपघाताला निमंत्रण

भरण्याचे काम बांधकाम विभागाने करणे अपेक्षित होते. मात्र, साईडपट्ट्या भरल्या नसल्याने वाहन चालवणे जिकरीचे बनले आहे. याचा रस्त्यावर कुरूळ ते बेलकडे फाटा यादरम्यान असणाऱ्या लहान साकवांची अवस्था बिकट झाली आहे. या साकवांच्या दोन्ही बाजू खचल्या आहेत.

साकवांच्या खचलेल्या बाजू सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निदर्शनात आणून दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने त्या साकवांच्या ठिकाणी धोक्याची सूचना म्हणून फीत असलेले छोटे गार्ड उभे केले आहेत. खरेतर, सार्वजनिक बांधकाम विभागाने या लहान साकवांची डागडुजी करण्याची गरज होती. परंतु तसे झाले नाही. यामुळे यंदाच्या पावसाळ्याच्या हंगामात या दोन्ही साकवांच्या परिसरात अपघात होण्याची अधिक शक्यता निर्माण झाली आहे. हा रस्ता 'हॅम' योजनेतून मंजूर करण्यात आला आहे. या रस्त्याचे काम युद्धपातळीवर सुरु आहे. रस्ता रुंदीकरण आणि निर्मितीवर भर दिला जात आहे. या रस्त्याच्या ठेकेदाराने पर्यटनासाठी उपयुक्त असणारा हा रस्ता आणि त्यावरील साकवांची बांधणी करणे अपेक्षित होते परंतु ठेकेदाराने बेलकडे आणि साई येथून रस्त्याच्या निर्मितीला सुरुवात केल्याने या रस्त्याचे काम रखडले आहे. अलिबाग नगरपरिषद ते बेलकडे फाटा असा रस्ता सिमेंट काँक्रीटचा करण्यासाठीचे प्रयत्न सुरु केले आहेत. तसे झाल्यास रस्ता उत्तम होईल परंतु त्याला अद्याप अवकाश आहे. यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि रस्त्याच्या ठेकेदाराने भविष्यातील दुर्घटना रोखण्यासाठी साकवांची झालेली पडझड आणि खचलेल्या साईडपट्टीबाबत वेळीच निर्णय घेणे गरजेचे बनले आहे. अन्यथा येथे दुर्घटना घडण्याची शक्यता वाहन चालक आणि प्रवासी वर्गातून वर्तवली जात आहे.

## एसटी पास मिळणार शाळेत

किंवा गटागटाने आगारात जाऊन आगार व्यवस्थापनाकडून पास घेतले जात होते. पण, यंदापासून विद्यार्थ्यांना पाससाठी आता रांगेत ताटकळत उभे राहावे लागणार नाही. त्यांच्या शाळा- महाविद्यालयांनी पुरवलेल्या यादीनुसार एसटीच्या कर्मचाऱ्याकडून त्या विद्यार्थ्यांना आणि विद्यार्थिनींना त्यांचे एसटी पास थेट शाळेत देण्यात येणार आहेत. जेणेकरून त्यांचा वेळ वाया जाणार नाही. या संदर्भात १८ जूनपासून एसटी प्रशासनातर्फे एसटी पास थेट शाळेत ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.


### जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशील श्री अरुण लक्ष्मण पाटील रा. बोर्ले, ता. पनवेल, जि.रायगड यांनी खालील मिळकतीचे मालक श्री. योगेश बबन जाधव रा. जिते, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून खालील वर्णन केलेली मिळकत कायम खरेदीखताने घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे.

**मौजे कुंभे, ता. कर्जत, जिल्हा रायगड.**

| सर्व्हे नं | हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.प्रती) | आकार |
|---|---|---|---|
| ७ | १ ब | एकूण क्षेत्र ०.१८.०० | २.५२ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकती बाबत इतर दुसरे कोणाचा साठेकारार, खरेदीखत, विकसनकरार, ताबाकब्जा, वहिवाट, गहाण, दान, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाचे आत खालील सही करणार वकील यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचाही हरकत न आल्यास सदर मिळकत हि निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशील व्यवहार पुंर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशीलांवर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दिनांक १७/६/२०२४

सही/-
**वकील- किशोर अनंता दिघे**
मु. खाड्याचापाडा, पो. पाषाणे
ता. कर्जत, जि. रायगड.
८००७९७०१५१

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. सोनटक्के यांनी खालील नमुद केलेल्या मिळकती मौजे सालशेत ता. तळा जि. रायगड ७/१२ सदरी दाखल असलेल्या विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशा आशयाचा करार विद्यमान मालक व आमचे अशिल यांचे दरम्यान झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे विकी व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | मालक | गट नं/ उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | १०२/२ | ०-८५-०० | ०.०० |
| २ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | १४६/१/२ | ०-३८-८० | ०.९७ |
| ३ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | १७९/१ | १२-५७-०० | ३.७६ |
| ४ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | १८०/३ | १-८६-०० | १.४३ |
| ५ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | २१८ | १-३१-०० | ०.५० |
| ६ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | २३३ | ०-२९-०० | ०.०६ |
| ७ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | २३५ | ०-५०-०० | ०.१२ |
| ८ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | २२१ | ०-९७-०० | ०.२५ |
| ९ | सालशेत ता. तळा | जलालुद्दीन मोहोम्मद दाऊदानी | १४७ | ४-६५-०० पैकी २-४०-०० | ६.७१ पैकी ३.९१ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाच्या ७ (सात) दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

पनवेल
दिनांक : १७/०६/२०२४

**ॲड. महेश म. गुंजाळ**
कृष्णा टॉवर, सेक्टर - ९ खांदा कॉलनी
पनवेल, तालुका पनवेल, जि.रायगड ४१०२०६
मो.नं. ९८२२०१३३५०

**निवडक**

## खारघरमध्ये दुचाकीची चोरी

**पनवेल :** कंपनीमध्ये कामासाठी गेलेल्या व्यक्तीची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना खारघर वसाहत परिसरात घडली आहे. पंकजकुमार सिंग हे खारघर सेक्टर-२० येथे मूथ्थूट फायनान्स या बँकेमध्ये कामानिमित्त गेले असताना त्यांनी त्यांची गाडी मूथ्थूट फायनान्स बँकेसमोर लावली होती. ते काम संपवून बाहेर आले असता त्यांना त्यांची दुचाकी त्याजागी न आढळल्याने आपली दुचाकी चोरीस गेल्याची तक्रार त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात दिली आहे.

## बकरी ईद होणार साजरी

**माणगाव :** ईद-उल-अजहा म्हणजेच बकरी ईद सोमवारी (दि. १७) सर्वत्र साजरी केली जाणार आहे. रमजान ईदनंतर दोन महिन्यांनी बकरी ईद येते.या बकरी ईदला अल्लाहच्या नावाने बोकडांवर दिल्या जाणाऱ्या कुर्बानीमुळे विशेष असे महत्व आहे.रमजान ईदप्रमाणेच बकरी ईद अत्यंत उत्साहात मुस्लिम बांधव साजरी करीत असतात. माणगाव नगरपंचायत हद्दीतील मस्जिद मोहल्ला येथील जामा मशिदीत बकरी ईदची नमाज सकाळी ८ वाजता होणार आहे.

## शांतता समितीची बैठक

**भाकरवड :** पोयनाड पोलीस ठाण्यात शांतता समिती व मोहल्ला समितीची बैठक पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अंकुश सांगळे यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी माजी ग्रामपंचायत सरपंच भूषण चवरकर, विरेंद्र तावडे, किशोर जैन, शुभाष पाटील, मज्जिद हुसेन, जावेद पेरेकर,अब्बास सय्यद, युसुफ कुरेशी, पोयनाड मोहल्ला समितीचे अनिश कुरेशी आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होते.

## अध्यक्षपदी रेहमान शेख

**माथेरान :** माथेरान ज्येष्ठ नागरिक संस्थेची विशेष सभा करसनदास मुळशी वाचनालय येथे उत्साहात पार पडली. संस्थेच्या अध्यक्षपदी रहेमान शेख यांची सर्वानुमते निवड करण्यात आली तर उपाध्यक्ष अरविंद रांजणे, सचिव अनंत शेलार, खजिनदार रजनी कदम, सहसचिव प्रकाश सुतार, अशोक पवार यांची सहखजिनदारपदी निवड करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक संघटनेमार्फत ज्येष्ठ नागरिक एकत्रित येऊन आपल्या प्रश्नांची उकल करत असतात, असे रहेमान शेख म्हणाले.

## प्रशिक्षकाने केला विनयभंग

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील आदई येथील पॅन्थर अकादमीतील तरणतलावामध्ये पोहण्यासाठी आलेल्या महिलेचा विनयभंग पोहणे शिकविणाऱ्या प्रशिक्षकाने केला आहे. महिला कपडे बदलण्यासाठी खोलीत गेली असता या प्रशिक्षकाने त्याच्या जवळील ॲपल कंपनीच्या मोबाईलच्या सहाय्याने महिलेचा व्हीडीओ काढला. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात महिलेच्या तक्रारीनंतर १९ वर्षीय प्रशिक्षक आदित्य फडके याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खाडीतील मासेमारीवर असणार मदार



■ व्यवसायात मंदी
■ सागरी मासेमारी बंदीनंतरची अवस्था

**। रायगड । प्रतिनिधी ।**
**अनेक अडचणींवर मात करीत यंदाच्या मासळी हंगामाचे सूप वाजले आणि पावसाळी बंदीमुळे मच्छीमारी नौका पाण्याबाहेर काढल्याने बंदर सुने सुने झाले. मासळीची उलाढाल मंदावल्याने पुढील काही महिने स्थानिक पातळीवर आर्थिक गणिते थंडच राहतील. सध्या खाडीतील मासेमारी सुरू असली तरी त्यातून अपेक्षित मासळी मिळण्याचे प्रमाण नगण्य आहे. मासळी अभावी पुरक व्यवसायही मंदावले आहेत. निसर्गाची अपेक्षित साथ लाभली तर हंगाम चांगला जाण्यास मदत होते. मे अखेरपर्यंत मत्स्य व्यवसाय संपुष्टात येतो आणि स्थानिक पातळीवर सर्वच बाबतीत आर्थिक शिथिलता येते.**

यंदा मासळी हंगामाची सुरूवात दमदार झाली होती. त्यानंतर कोळंबी मासळी मिळाल्याने हंगामाचा शेवटही चांगला झाला. मात्र, हंगामाच्या मध्यावधीचा कालावधी तितकासा समाधानकारक झाला नाही. त्यामुळे यंदाच्या मासळी हंगामात चढउतार राहिले. मध्यंतरी मासळीचे प्रमाण घटल्याने मत्स्य व्यवसायिकांना आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागले. मच्छिमारांचा दैनंदिन खर्च आणि मासळी मिळण्याचे प्रमाण व्यस्तच राहिले. तसेच उपलब्ध मासळीला अपेक्षित दर नसल्याने खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ घालणे अवघड बनले. डिझेल, बर्फ, वाहतूक, मच्छीमार दैनंदिन खर्च तसेच राहिले आणि मासळीचे प्रमाण मात्र कमी राहिल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्या. शासनाच्या निकषांप्रमाणे १ जुन ते ३१ जुलै असा मासेमारी बंदी कालावधी असल्याने ३१ मे रोजी हंगामाचा शेवट झाला. एक ऑगस्टपासून नव्या हंगामाची सुरूवात होणार असली तरी पाऊस आणि समुद्राची संभाव्य वादळी स्थिती लक्षात घेता मच्छिमार तातडीने मासेमारी हंगामाला प्रारंभ करताना दिसत नाही. सर्वसाधारणपणे मच्छिमार नारळीपौर्णिमेला नौकांची विधिवत पूजा करून नव्या हंगामासाठी सज्ज होतात. मात्र, खऱ्याअर्थाने गणेश विसर्जनानंतरच नव्या हंगामाची चाहूल लागते. त्यामुळे ६१ दिवसांचा मच्छिमारी बंदी कालावधी असला तरीही हंगाम सुरू होईपर्यंत सुमारे तीन महिने होतात.

त्यामुळे या काळात सर्वच बाबतीत थंड प्रतिसाद असतो. काहीजण पावसानंतर तातडीने मासेमारीला जातात. त्यावेळी बऱ्यापैकी मासळी मिळते, असा अनुभव असल्याने हंगामाच्या सुरूवातीची मासळी कॅच करण्यासाठी मच्छिमारांची धडपड असते. सध्या मच्छिमारी ट्रॉलर पाण्याबाहेर काढण्यात आल्याने बंदर सुनेसुने झाले आहे. मासळी लिलावाच्या ठिकाणी शुकशुकाट पसरलेला असतो. पाण्याबाहेर काढलेल्या नौकांची डागडुजी सुरू आहे. नौकांची पावसाळी कामे केली जात आहेत. नव्या हंगामासाठी नौका सज्ज केल्या जात आहेत. यंदाच्या हंगामाची साधकबाधक चर्चा करीत मच्छिमार नव्या हंगामाच्या आशा उराशी बाळगून आहेत.

### आर्थिक उलाढालीची स्थिती बदलली

**पूर्वी डिजिटल जमान्याआधी मे महिन्यातील मासळीची रक्कम पुढे जुन-जुलै महिन्यापर्यंत यायची. त्यामुळे पावसाळ्यातही बऱ्यापैकी चलती असे. मात्र, सद्यस्थितीत डिजीटल आणि सोशल मिडियामुळे उलाढालीचे चित्र रोजच्या रोज समजत असल्याने आर्थिक उलाढालीची स्थिती ज्यात्यावेळीच स्पष्ट होत असल्याचे चित्र आहे..**

### तर यांनाही बसतो फटका

**मासळी हंगाम संपुष्टात आल्याने तसेच मध्यंतरी मासळी मिळण्याचे प्रमाण कमी झाल्याने त्याचा थेट परिणाम पुरक व्यवसायावर होताना दिसतो. वाहतुक व्यवस्थेसह अन्य पुरक व्यवसायांना त्याची आर्थिक झळ सोसावी लागते. मासळी लिलावाच्या ठिकाणी मासळीची उलाढाल चांगली राहिल्यास छोट्या व्यवसायिकांनाही त्याचा लाभ होतो. त्यामुळे मासळीशी निगडित अन्य मंडळीनाही हंगामातील चढउताराची तीव्रता सहन करावी लागते.**

# पथकर नाक्यावर वाहनांच्या रांगा

**। खालापूर । वार्ताहर ।**
सलग तीन दिवस सुट्ट्या आल्याने मुंबई नवी मुंबई ठाणे आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने मुंबई बाहेर पडले आहेत. त्यामुळे पुणे द्रुतगती मार्गावरील पथकर नाक्यावर शेकडो गाड्या एकाच वेळेस दिसून येत आहेत.

रविवार आणि सोमवारी बकरी ईदची सुट्टी असल्याने या सलग तीन सुट्ट्या शहराबाहेर निवांत घालवण्यास वा गावाकडे राहण्यास मोठ्या संख्येने नागरिक जात आहेत. त्यामुळे शीव पनवेल मार्गावरील वाशी आणि खारघर पथकर नाक्यावर वाहतूक कोंडी सदृश्य स्थिती झाली आहे. त्या मानाने हलक्या वाहनांना पथकर नसल्याने खारघर पथकर नाक्यावर कमी गर्दी दिसून येत आहे.

सर्वाधिक वाहनांच्या रांगा खालापूर पथकर नाक्यावर दिसून येत असून सुमारे एक किलोमीटर पर्यंत या रांगा आहेत. विशेष म्हणजे सध्या फार क्वचित व्यक्ती वापर करून पथकर वसुली होते अन्यथा वाहन हलके असो वा जड किंवा अवजड बहुतांश वाहनांना फास्ट टॅग सुविधा असते तरीही एवढी गर्दी होत असल्याने वाहन चालकात आश्चर्य व्यक्त होत आहे.असे असले तरी द्रुतगती मार्गावर लोणावळा व्यतिरिक्त फारशी कुठेही वाहतूक कोंडी दुपारपर्यंत नव्हती. वाहनांच्या संख्येत वाढ होत असल्याने संध्याकाळ नंतर वाहतूक कोंडी होऊ शकते अशी माहिती एका वाहतूक पोलीस कर्मचाऱ्याने दिली. तेव्हा जर या सुट्टीच्या दिवसात मुंबई बाहेर जायचे असेल तर पथकर नाक्यावर लागणारा वेळ लक्षात घेऊन त्या प्रमाणे नियोजन करावे.

# आरटीई प्रवेशाची यादी लांबणीवर

**। रायगड । प्रतिनिधी ।**
शिक्षणाचा हक्क कायद्यांतर्गत खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये २५ टक्के जागांवर प्रवेशाची प्रक्रिया बारगळली आहे. यासंदर्भात न्यायालयात याचिका दाखल असल्याने सोडत जाहीर करूनही शिक्षण विभागाने तपशील जाहीर केलेला नाही. न्यायालयाच्या आदेशानुसार सोडत जाहीर करणार असल्याची भूमिका शिक्षण विभागाने जाहीर केली आहे.



शिक्षण हक्क कायद्यांतर्गत खासगी शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या प्रवेशाची यादी १३ जून रोजी प्रसिद्ध होणार होती. मात्र, आरटीईचे संकेतस्थळच खुले होत नसल्याच्या तक्रारींमुळे पालक आणि विद्यार्थ्यांचा हिरमोड झाला.

आता पालकांना आणखी चार-पाच दिवस वाट पहावी लागणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. शाळा सुरु होण्याचे दिवस जवळ आले असताना ही आमच्या मुलांचे प्रवेश कधी होणार असा सवाल पालकांनी केला आहे.

शिक्षण विभागाने आरटीई प्रक्रियेत केलेला बदल, त्याला न्यायालयाने दिलेली स्थगिती, त्यानंतरच जुन्या पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबवण्याचा निर्णय, या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर काही पालकांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी राज्यात यंदा ९ हजार २१७ शाळांमध्ये १ लाख ५ हजार ३९९ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. या जागांसाठी अर्ज करण्यासाठी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने ३१ मे पर्यंतची मुदत दिली होती. मात्र, अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने ५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर २ लाख ४३ हजार १९ अर्ज दाखल झाले असून त्यासंदर्भाने प्रवेशाची सोडत ७ जून रोजी निश्चित करण्यात आली होती. परंतु प्रकरण न्यायालयात पोहोचल्याने प्रवेशाची यादी १३ जूननंतर प्रसिद्ध करण्यात येणार होती. मात्र, १३ जून रोजी संकेतस्थळच खुले होत नसल्याचे पाहून पालकांमध्ये पुन्हा खळबळ निर्माण झाली.

## अल्पवयीन मुलाचे अपहरण

**खालापूर :** खालापूर तालुक्यातील सावरोली येथील टाऊनशिप बिल्डींगमधील एक अल्पवयीन मुलगा खोपोलीतील लक्ष्मीनगर येथील जय जगन्नाथ येथे क्लासला जातो असे घरात सांगून गेला. परंतु तो पुन्हा घरी परतलाचा नाही. त्या अल्पवयीन मुलाच्या अज्ञातपणाचा फायदा घेत कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून त्याला पळवुन नेले असल्याचा संशय त्या मुलाच्या कुटुंबियांना आहे. याबाबत त्या मुलाच्या कुटुंबियांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई रोहिदास भोर हे करीत आहेत.

# मुरबाड रस्त्यावर टेम्पोची रिक्षाला धडक

■ तिघे जखमी
■ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**। नेरळ । वार्ताहर।**
कर्जत मुरबाड रस्त्यावर कळंब जवळील पोही फाटा येथे गॅस सिलिंडर घेवून जाणाऱ्या टेम्पोने प्रवासी रिक्षाला धडक दिली.या अपघातात रिक्षाचे मोठे नुकसान झाले असून या अपघातात तिघे जखमी झाले आहेत. या अपघातास जबाबदार असल्याबद्दल टेम्पो चालक अमर राठोड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




कळंब येथील प्रवासी रिक्षा रविवारी (दि.१६) सकाळी प्रवाशांना घेवून निघाली होती. साडेआठ वाजण्याच्या सुमारास पनवेल येथून कर्जत रस्त्याने शहापूरकडे निघाली होती. टाटा अल्ट्रा टेम्पोने रिक्षाला धडक देत रिक्षाला ओढत नेली. प्रवासी रिक्षाचे मालक यशवंत परशुराम डोंगरे हे प्रवाशांना घेवून निघाले होते. त्यांच्या प्रवासी रिक्षाला गॅस सिलिंडरने भरलेल्या टेम्पोने धडक दिली असून या धडकेत रिक्षा खांबावर जावून आदळली. टेम्पो चालक अमर राठोड यांने भरधाव वेगाने आणि रस्त्याची तीन चौक लक्षात न घेता हयगय करीत वाहन चालविल्याने हा अपघात घडला आहे. या अपघातास कारणीभूत असलेले टेम्पोवर अपघाताची जबाबदारी टाकण्यात आली आहे.जखमी प्रवाशांना कळंब प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार करण्यात आले आहेत. भरधाव वेगाने येत असल्याने चालकाचे नियंत्रण सुटले व नेरळ दिशेला जात असणाऱ्या रिक्षा चालक यशवंत परशुराम डोंगरे यांच्या रिक्षाला जोरात धडक दिली.

त्यावेळी रिक्षामध्ये दोन प्रवासी होते.

सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसून प्रवासी आणि रिक्षा चालक यांस किरकोळ दुखापत झाली आहे. जखमी प्रवासी पुंडलिक डोंगरे, गौतम बनसोडे आणि अवधूत सोनावणे हे प्रवासी होते.

रिक्षाचा पूर्ण चक्काचूर झाला असून रिक्षेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अपघातानंतर गॅस सिलिंडर वाहून नेणारी गाडी पोलिसांनी कळंब आऊट पोस्ट येथे ठेवली आहे. टेम्पोचालक अमर राठोड बदलापूर यांच्यावर गुन्हा नोंद केला आहे.

# कातळशिल्पांना चिरेखाणींचा धोका

■ संशोधकांच्या चिंतेत वाढ
■ संरक्षणासाठी प्रशासन लक्ष अपेक्षित

**। रत्नागिरी । वार्ताहर ।**
संस्कृतीवर प्रकाश करणारी कोकणातील जांभ्या कातळावर कोरलेली कातळेशिल्पे बदलत्या काळात माणसाच्या अतिक्रमणामुळे अडचणीत आली आहेत, अशी चिंता शिल्पप्रेमींमधून व्यक्त केली जात आहे. कातळावरील चिरेखाणी या कातळशिल्पांसाठी अडचणीच्या ठरू शकतात. त्या दृष्टीने प्रशानाकडून पावले उचलली पाहिजेत.



कोकणातील मोकळ्या माळरानावर हजारो वर्षापूर्वी कोरण्यात आलेल्या शिल्पांना निसर्गापासून कोणताही धोका नाही. तसे असते तर काळाच्या ओघात त्याचे अस्तित्व नामशेष झाले असते. प्रदीर्घ काळातील ऊन, वारा, पाऊस व उष्णता वा वातावरणातील बदलांचा या शिल्पावर काहीही परिणाम झालेला नाही. जिल्ह्यात अनेक ठिकाणी अशी शिल्पे आढळून आल्यामुळे कातळशिल्पाबद्दल समाजात मोठी जागृती झाली आहे. शिल्पांचे स्थान जांभा कातळात व शक्यतो मानवी वस्तीपासून मोकळ्या माळरानात आढळून येतो. कोकणात घरांच्या बांधकामाकरिता जांभा दगडाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे चिरे काढणाऱ्या खाणी जागोजागी व गावागावात आहेत.

चिरेखाण ही जमिनीचा कडक व दगडी पृष्ठभाग संपल्यावर काही ठराविक कालावधीनंतर दुसऱ्या ठिकाणी हलवण्यात येते. त्यामुळे अज्ञानापोटी या कातळशिल्पाची नासधूस होण्याची शक्यता आहे. कातळशिल्पे सापडलेला परिसर वगळता सर्वच ठिकाणी चिरेखाणी आहेत. त्या खाणीतील माती पावसाच्या पाण्यामुळे शिल्पावर येते. कोकणातील लाल चिऱ्यांनी सध्या पूर्ण महाराष्ट्राला वेड लावले आहे. खाणीतील चिऱ्यांना मोठी मागणी असल्याने चिऱ्यांचे उत्पादन दरवर्षी वाढत आहे.

> कोकणातील कातळशिल्पे ही प्रागैतिहासिक मानवाची कोकणसंदर्भात वेगळीच ओळख सांगते. ही कातळशिल्पे जतन करणे, त्यांचे संवर्धन करणे काळाची गरज आहे. राजापूर आणि रत्नागिरी परिसरात कातळशिल्पांची नोंद शासनाने केलेली असल्यामुळे त्याचे संरक्षण होत आहे. पुढील पिढ्यांचा वारसा म्हणून टिकवून ठेवण्यासाठी कातळशिल्पांभोवती संरक्षक कठडा उभारणे आवश्यक आहे.- डॉ. अजय धनावडे, कातळशिल्प संशोधक.

## कामोठ्यामध्ये मोफत वह्या वाटप

**पनवेल :** शिवसेना युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने तसेच शिवसेना पुरस्कृत व रामदास गोवारी सामाजिक विकास मंडळ कामोठे तर्फे सालाबादप्रमाणे या ही वर्षी एक सामाजिक बांधिलकी म्हणून गरीब व गरजु विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम शिरीष घरत व बबन पाटील यांच्या प्रमुख उपस्थतीत कामोठे गावात पार पडला. यावेळी शिवसेनेचे दीपक घरत, प्रभाकर गोवारी, रामदास गोवारी, अवचित राऊत, संतोष गोळे, धाया गोवारी, संगीता राऊत यांच्यासह पदाधिकारी व विद्यार्थी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ४५ लाखांच्या गांजासह वाहन जप्त

**। पनवेल । वार्ताहर।**
राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक क्र.२ पनवेल विभागाने पनवेलजवळील तक्का येथे आज २ दोन आरोपींना ताब्यात घेवून त्यांच्याकडून जवळपास ४५ लाखाच्या गांजासह गुन्ह्यात वापरलेले वाहन जप्त केले आहे.


दोन आरोपी ताब्यात

पनवेल मुंब्रा हायवेच्या डाव्या बाजुस स्टार वेल्डींग समोर, तळोजे पाचनंद, से. नं. ४०, तळोजे येथे २ दिवसापूर्वी १ कोटी रूपये किमंतीचा जास्त किमंतीचा गांजा हा अंमली पदार्थाचा मोठासाठा व एक चारचाकी एक्सयुव्ही ५०० वाहन जप्त केले होते. व दोन आरोपींना अटक केलेली होती. सदर आरोपींना कार्यालयात चौकशीकामी आणले असता आरोपी परवेझ शेख याच्या मोबाईलवर एका अनोळखी इसमाचा कॉल आला त्याने अंकल मी पनवेल येथे माल घेऊन आज सायंकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान ईनोव्हा गाडीने येत आहे असे बोलला.

सदर इसमाशी राज्य उत्पादन शुल्क अधिकारी यांनी सुध्दा ते अंकलच आहेत असे बोलून त्याला तु सदर माल घेऊन तक्का पनवेल येथे जुना मुंबई-पुणे रोडवर पंचमुखी मारूती मंदिरसमोर ये असे बोलले. त्यानुसार हनोझ होशी इंगीनीर (इंजिनियर) रा. लोणावळा, व दिवा उंबरे यांना चारचाकी वाहन ईनोव्हाने ते मालासह तक्का पनवेल येथे आले व अलगदपणे राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या सापळ्यात अडकले. सदर आरोपींच्या ताब्यातून १३५ किलो गांजासह एक चारचाकी ईनोव्हा वाहन असा एकुण ४५,७५,००० रूपये किमंतीचा मुद्देमाल ताब्यात घेतला आहे.

# वर्षाऋतुमधील निसर्ग न्याहाळण्यासाठी माथेरानला पसंती

**। माथेरान । वार्ताहर ।**
***वर्षाऋतुमध्ये मुंबईपासून अगदी जवळ असलेल्या माथेरानसारख्या सुंदर पर्यटनस्थळाची भ्रमंती म्हणजे पर्यटकांना एक पर्वणीच असते.त्यामुळे पर्यटक आवर्जुन हजेरी लावत असतात.अन्य पर्यटन स्थळांच्या तुलनेत केवळ वाहतुकीची खर्चिक बाब वगळता अगदीच स्वस्त दरात राहण्याची सोय लॉजिंगच्या माध्यमातून त्याचप्रमाणे हॉटेलमध्ये होत असते.***





*वर्षाऋतु मध्ये इथल्या नैसर्गिकरित्या साकारणाऱ्या निसर्गाच्या चमत्काराची सप्टेंबर महिन्यात खऱ्या अर्थाने अनुभुती पहावयास मिळते. बारा महिन्यांतील पवित्र समजला जाणाऱ्या श्रावण महिन्यात इथे निसर्ग निर्मितीचा अलौकिक आंनद आणि अधूनमधून पावसाच्या हलक्या सरी आणि श्रावण तापीच्या कोवळ्या उन्हात पॉईंट्सची सैर करण्यात एक वेगळाच आनंद मिळतो. सप्टेंबर महिन्यात डोंगर रांगात सभोवताली आणि पॉईंट्स परिसरात सोनकीची पिवळी फुले आच्छादलेली असतात.*

*चोहोबाजूंनी गर्द झाडी आणि त्यातून पायी चालत जाण्याची मजा सुध्दा काही औरच असते. पावसाळी हवामानात गर्द धुक्यातून मार्गक्रमण करताना अगदी समोरचं दृश्यदेखील दृष्टीक्षेपात येत नाही.नैसर्गिक सौंदर्य धुक्यात हरवल्यामुळे ही सह्याद्रीच्या पर्वत रांगेतील विहंगमय दृश्ये न्याहाळण्यासाठी पर्यटक विविध पॉईंट्स वर गर्दी करतात. पॉईंटवरील हे दाट धुक्याचे नैसर्गिक आवरण मनाला मोहीत करते.धुके विरळ झाल्यावर क्वचितच इंद्रधनूची कमान धुक्या आड दिसल्यावर मन प्रसन्न होते. शारलोट लेक वरील ओसंडून वाहणाऱ्या पाण्याखाली भिजण्याचा आनंद घेण्यासाठी पर्यटक आतुर झालेले असतात. महत्त्वाचे जवळपास पंधरा पॉईंट्स असून इको पॉईंट, लुईझा पॉईंट, वन ट्री हिल, लिटिल चौक पॉईंट, सनसेट, रामबाग, हनिमून पॉईंट, मलंग पॉईंट असे काही महत्त्वाच्या स्थळांना भेटी दिल्यावर खरोखरच मनाला आलेली ग्लानी दूर होते निसर्गाच्या सानिध्यात वेळ कसा निघून जातो याचे भान रहात नाही. पावसात भिजल्यावर कुठल्या स्टॉलवर गरमागरम भजी चहाचा आस्वाद घेत तर कुठं निखाऱ्यावर भाजलेला गरमागरम मका खाण्याचा मोह सुध्दा आवरता येत नाही. कुणी घोड्यावर तर आबालवृद्ध हातरिक्षाच्या सहाय्याने पॉईंट्सवरील नयनरम्य देखावे पाहण्यासाठी जात आहेत. एकंदरीत पूर्वीचे आणि आताचे वर्तमानातील माथेरान यात जमीन अस्मानाचा फरक प्रकर्षाने जाणवतो. तीन दशकांपूर्वी पावसाळ्यात इथले संपूर्ण व्यवहार बंद असायचे.हॉटेल्स आणि जुन्या बंगल्याना गवताच्या झडी लावून चार महिने या सर्व वास्तू बंदिस्त असायच्या परंतु इथे वर्षाऋतुमध्ये पर्यटकांची रेलचेल वाढू लागल्याने आता हे सुंदर स्थळ बाराही महिने पर्यटकांना सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सज्ज असते.*

# ६३०० हेक्टरवर होणार भातशेती

■ पेरणीसाठी नांगरणीला सुरुवात

**। पनवेल । वार्ताहर ।**
पेरणी योग्य पाऊस झाल्याने पनवेल मधील शेतकरी आपल्या शेतात नागरंणी करीत असून धान पेरणीच्या कामाला लागला आहे. यावर्षी कृषी विभागाच्या माहितीनुसार तालुक्यात ६३०० हेक्टरवर भातशेती केली जाणार आहे.

तालुक्याचा झपाट्याने विकास होत आहे.तालुक्यात आंतराष्ट्रीय विमानतळ आल्याने जमिनींना सोन्याचे भाव प्राप्त झाले आहे. त्यामुळे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या दरवर्षी झपाट्याने कमी होत आहे. मात्र असे असले तरी बहुतांशी शेतकरी आपला परंपरागत शेती व्यवसाय करीत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी पेरणीपूर्व मशागत तसेच खत टाकणे, पार, धुरे दुरुस्त करणे, शेतीची सफाई करणे इत्यादी कामे जवळपास संपविली होती. मृग लागला की पऱ्हे टाकायचे या तयारीत शेतकरी होते. परंतु शेतकऱ्यांना पऱ्हे टाकण्यासाठी जमिनीची नागरणी करणे आवश्यक असते.

अशात प्रत्येक शेतकरी पावसाची वाट बघत होता.मृगाच्या सुरुवातीला एकदा तरी पावसाने हजेरी लावावी, अशी अपेक्षा करीत होते. दमदार पाऊस झाल्याने सगळ्या शेतकऱ्यांची कामे सुरु झाली. प्रत्येक शेतकरी धान खरेदी करुन किंवा मागील वर्षीचे ठेवलेले बियाणे वापरुन पेरणी करीत आहेत.

# निर्धार आणि आव्हान

येत्या विधानसभा निवडणुका आपण एकत्रितपणेच लढवणार असल्याचे महाविकास आघाडीतील तीन प्रमुख पक्षांनी शनिवारी जाहीर केले. काँग्रेस, राष्ट्रवादी आणि शिवसेना ठाकरे गट यांच्या संयुक्त पत्रकार परिषदेत याची घोषणा करण्यात आली. ती गरजेची होती. कारण, लोकसभेच्या निकालांनंतर काँग्रेस आणि शिवसेना यांच्यात मतभेद असल्याच्या बातम्या पेरण्यात आल्या होत्या. सध्या बराचसा मिडिया आणि सोशल मिडिया भाजपच्या कह्यात आहे. किंवा निदान त्याच्या प्रभावाखाली तरी नक्कीच आहे. येत्या तीन महिन्यात राज्यात विधानसभा निवडणुका होत आहेत. त्यामुळे आघाडीत फाटाफूट घडवून आणण्याचा निकराचा प्रयत्न भाजपवाले करीत आहेत. पण आघाडीने आपला ऐक्याचा निर्धार व्यक्त करून या प्रचाराला चोख प्रत्युत्तर दिले आहे. लोकसभा निवडणुकीत भाजपचे पुरते तोंड फुटले. केवळ नऊ जागा मिळाल्या. या पराभवाबाबत भाजपचे अंतर्गत चिंतन चालू आहे व असणारच. त्या चिंतनातले खरे मंथन बाहेर येण्याची शक्यता नाही. त्या पक्षाचे प्रकट चिंतन मात्र रोज चालू आहे. पराभव खुलेपणाने मान्य करण्याऐवजी नवनवीन कारणे शोधणे किंवा आपला पराभव झालेलाच नाही असे सांगणे असे उद्योग चालू आहेत. मुंबईमध्ये भाजपला एक जागा मिळाली. ठाकरे शिवसेना व काँग्रेसला चार जागा मिळाल्या. तरीही विधानसभा मतदारसंघांचा हिशेब करून भाजपलाच कसा फायदा आहे, मराठी मतदारांनी भाजपलाच कशी मते दिली आहेत असा प्रचार देवेंद्र फडणवीस यांनी चालवला आहे. मुस्लिम आणि दलित यांनी महाविकास आघाडीला एकगठ्ठा मतदान केल्याने तिचा विजय झाला हे तर वारंवार सांगितले जात आहे. या दोन समाजांनी भाजपच्या विरोधात मते दिली हे खरे आहे. पण त्याला भाजपचे नेते व त्यांची वक्तव्ये जबाबदार आहेत. घटना बदलण्यासाठी भाजपला चारशे पार जागा मिळायला हव्यात असे त्यांचे नेते म्हणत होते. त्यामुळे भाजप राक्षसी बहुमताने सत्तेत आला तर तो नोकऱ्या व शिक्षणातील आरक्षण काढून टाकेल अशी भीती या समाजांमध्ये निर्माण झाली.

### पडूनही नाक वर

महाविकास आघाडीने तीच भीती केवळ बोलून दाखवली. आपण तसे होऊ देणार नाही असे आश्वासन आघाडीने दिले. आघाडीच्या नेत्यांविषयी लोकांना भरवसा वाटला. काँग्रेस किंवा राष्ट्रवादीने सातत्याने आरक्षणाच्या बाजूची भूमिका घेतली आहे. शिवाय या आघाडीमध्ये शेकाप व इतर पुरोगामी पक्षही सहभागी होते. त्यामुळे त्यांचा अंकुश तिच्यावर राहील याची खात्री जनतेला होती. तिकडे मतदान विरोधात जाते आहे हे पाहिल्यावर नरेंद्र मोदी यांनीही आरक्षण बदल होऊ देणार नाही अशी गॅरंटी देण्याचा प्रयत्न केला. पण त्यांच्या शब्दावर या समाजातीलच नव्हे तर इतर असंख्यांचाही विश्वास उडाला आहे. मोदी की गॅरंटी म्हणून भारतभर फिरलेल्या या नाटकी नेत्याच्या शब्दांना मराठी जनतेने भुस्कटांचीही किंमत दिली नाही. त्यांनी भाजपकडे पाठ फिरवली. भाजपला हे कटू सत्य कळलेले आहे. पण ते मान्य करण्याची मात्र त्याची तयारी नाही. हरलो तरी नाक वर असा प्रकार सध्या चालू आहे. असे करणे हा दलित व मुस्लिम समाजाचा मोठा अपमान आहे. हे समाज भारताचे नागरिक आहेत. त्यांनी घटनेच्या चौकटीत राहून व तिच्या रक्षणासाठीच मतदान केले आहे. राममंदिराच्या नावाखाली हिंदूंनी एकत्रित मतदान केले तर ते भाजपला चालते. तो व्होट जिहाद होत नाही. किंबहुना, असे मतदान करावे असा भाजपचा नेहमी प्रयत्न चालतो. त्याचे नेते प्रचारसभांमध्ये देखील जय श्रीराम, जय बजरंगबली अशा घोषणा देत होते. निवडणूक आयोगदेखील त्यांच्याच पंखाखाली असल्याने त्यानेही भाजपला याबाबत चाप लावला नाही. दुसरे म्हणजे यावेळी खुद्द पंतप्रधान मोदी यांनी मुस्लिम समाजाला घुसखोर, जिहादी अशी विशेषणे लावली व त्यांना मिळणारे आरक्षण किंवा इतर लाभ म्हणजे जणू काही दरोडा आहे असा प्रचार केला. इतके करूनही त्या समाजाने आपल्या विरोधात मतदान करू नये अशी अपेक्षा करणे म्हणजे कहर झाला.

### विविध आव्हाने

आघाडीने सुरुवात चांगली केली असली तरी त्यांची वाट सोपी नाही. लोकसभेला नरेंद्र मोदी यांच्या हुकुमशाहीला हरवणे हे महत्वाचे उद्दिष्ट होते. जनतेला तो उद्देश पटला. विधानसभेला विषय बदललेले असतील. भाजपने घडवून आणलेल्या फाटाफुटीच्या विरोधातला राग लोकसभेला व्यक्त झाला. आता पुन्हा त्याच विषयावर जनता आघाडीच्या बाजूने उभी राहील याची खात्री देता येत नाही. शिवसेना शिंदे गटाची ताकद दुर्लक्षित करता येणार नाही. लोकसभेच्या अनेक लढती फार चुरशीच्या झाल्या. विधानसभेला तर हे चित्र अधिक गुंतागुंतीचे होईल. अजितदादांना सध्या एकच जागा मिळाली असली तरी विधानसभेला त्यांचा परिणाम नक्कीच दिसेल. भाजपकडे पैसा व माध्यमांची ताकद आहे. यांना तोंड द्यायचे असेल तर आघाडीला सहानुभूतीच्या पलिकडे आणखी अनेक मुद्द्यांवर बोलावे लागेल. शिंदे सरकारच्या अकार्यक्षमतेवर प्रकाश टाकावा लागेल. शिंदे सरकारने गाजावाजा करून घेतलेल्या रोजगार मेळाव्यांमधून फार नोकऱ्या मिळाल्याच नाहीत. अशासारख्या विषयांवर युतीला घेरावे लागेल. महायुतीमधील तीनही पक्षांमधले मतभेद अधिक कसे वाढतील हे पाहावे लागेल. सर्वात महत्वाचे म्हणजे, आघाडीसोबत असलेल्या शेकाप, समाजवादी, कम्युनिस्ट इत्यादी पक्षांना सन्मानाने वागवावे लागेल. आपल्या पक्षांची मते या पक्षांच्या उमेदवारांना मिळतील याची हमी द्यावी लागेल. सांगलीवर कबजा करण्याचा उद्धव यांचा प्रयत्न अगोचरपणाचा होता. तसे प्रकार पुन्हा होणार नाहीत हे पाहावे लागेल जागावाटप सोपे असणार नाही. त्याच्या चर्चा पडद्याआडच राहतील हे पाहावे लागेल. एकमेकांची जाहीर उणीदुणी काढणे, मुख्यमंत्री कोण असल्या अस्थानी चर्चा करणे यात पडणे टाळावे लागेल. सध्या महाराष्ट्रातले जनमत निःसंशय भाजपच्या विरोधात आहे. भाजपवाले अजूनही फोडाफोडी करू शकतात. याउलट, जनतेचा पाठिंबा ही महाविकास आघाडीची ताकद आहे. पण तो मात्र मतपेटीतून व्यक्त होण्यासाठी आघाडीच्या नेत्यांना प्रचंड प्रयत्न करावे लागतील.

विचार

# बाबाविषयी बोलताना...

*पुण्यातील भीषण अपघातामुळे अल्पवयीन मुलगा आणि त्याचे पिता तसेच त्याच्या पित्याचे पिता असे तिघेही चर्चेत असल्याच्या पार्श्वभूमीवर साजरा होणारा यंदाचा फादर्स डे अनेक प्रश्न उपस्थित करणारा आहे. सध्याच्या चंगळवादी जीवनशैलीत पाल्यांवर योग्य संस्कार करण्याची, त्यांना सजग, सुजाण आणि जबाबदार बनवण्याची जबाबदारी आईप्रमाणेच वडिलांच्या शिरावरही आहे. आता*



**उर्मिला राजोपाध्ये**

मातृत्व असो की पितृत्व, ते स्विकारणे आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या जबाबदाऱ्यांचे पालन करताना स्वत:च्या जीवाची बाजी लावणारे अनेक प्रसंग पेलणे अनिवार्य आहे. मात्र हे सगळे अडथळे हसत हसत स्विकारतात आणि अपत्यांच्या जीवनाचे मळे फुलवतात म्हणूनच माता आणि पिता देवाच्या ठिकाणी जाऊन बसतात. पूर्वी कळत्या वयापासून मुले पालकांचे हे ऋण मानत होती आणि अखेरच्या क्षणापर्यंत साथ देऊन त्याची बूजही ठेवत होती. मात्र पाश्चिमात्य संस्कृतीच्या प्रभावाने वेगवेगळ्या नात्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करणाऱ्या एकेका दिवसाची उत्पत्ती झाली आणि त्या धबडग्यात पित्यालाही एक दिवस मिळाला...! आता या दिवशी म्हणजे फादर्स डे ला काही घरांमध्ये तरी पिता आणि मुलांचा मोकळा संवाद होतो. रिवाजाप्रमाणे भेटींची आणि शुभसंदेशांची देवाणघेवाण होते. एखादे सरप्राईज डिनर आयोजित केले जाते आणि आपण पित्याप्रती किती जागरुक आहोत, हे सिद्ध करणारी स्टोरी वा त्याच्याबरोबरचे फोटो सोशल मीडियावर शेअर करुन या दिवसाची सांगता होते. काळाचा महिमा म्हणून आपण हे सगळे स्विकारले आहे. मात्र या सगळ्याच्या पलिकडे पित्याचा विचार करणे ही काळाची खरी गरज आहे, असे आता तीव्रतेने जाणवते.

सध्या एका किशोरवयीन मुलाने मद्यधुंद अवस्थेत घरातील आलिशान गाडी चालवत दोघा दुचाकीस्वारांना उडवल्याची घटना चर्चेत आहे. त्या निमित्ताने या पितापुत्राच्या अटकेबरोबरच संबंधित मुलाचा आजोबादेखील अटकेत असल्यामुळे सदर घटनेकडे समाजाचे लक्ष लागून राहिले आहे. म्हणजेच पिता-पुत्राच्या दोन जोड्या सध्या चर्चेचा विषय ठरल्या आहेत. हे घराणे पैसेवाले असल्याने मीडिया मागे लागला आहे, असे क्षणभर गृहीत धरले तरी घराघरातले चित्र फारसे वेगळे राहिलेले नाही. एकीकडे आत्तापर्यंत समाजाने पित्यावर कर्तव्यकठोर असल्याचे लेबल लावले. त्याच्या शिस्तीच्या बडग्याचा धिक्कार केला. त्याच्या धाकाला अयोग्य मानले. मुलांनी मागितले की तात्काळ कधीच द्यायचे नाही, हे ब्रिद जपणाऱ्या मागील पिढीतील अनेक पित्यांनी पुढे आयुष्यभर मुलांच्या आयांचे भलेबुरे बोल ऐकले. म्हणजे तेव्हाही त्याच्यावर टीकाच झाली. मुले आईशी लगटून राहिली, तिला आपल्या भावविश्वात मानाचे स्थान दिले. पण दुसरीकडे त्यांनी पित्याला मात्र दोन हात दूर ठेवले. हे पाहून आजचा पिता मुलांच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न करतो, त्यांचे लाड पुरवतो, त्यांना हवे ते सर्व देतो आणि त्यानंतरही काय घडते, हे सध्याची स्थिती दाखवून देते. त्यामुळेच फादर्स डे साजरा करताना मुलांच्या आयुष्यात पित्याची भूमिका नेमकी कशी असायला हवी, याबद्दल गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे.

अपत्यावर जीवापाड प्रेम असणे हे केवळ मातेचे स्वभाववैशिष्ट्य समजण्याचे काहीच कारण नाही, कारण अपत्यजन्मानंतर पिताही त्याच भूमिकेतून जगायला शिकत असतो. त्यातच आपल्याकडील पुरुषसत्ताक पद्धतीने जन्मापासूनच मुलांवर जबाबदारी सांभाळणारा कर्ता माणूस असल्याचे बिंबवले आणि याच संस्कारांची पेरणी झाल्यामुळे त्याची मातीच काहीशी कठोर घडत गेली. पण काळ पुढे सरत गेला तसा त्याच्या स्वभावातही बदल दिसू लागले. पिढीसरशी पितृत्व अधिकाधिक कोमल आणि मृदू बनत गेले. सतत छडी घेऊन वावरण्याच्या अविर्भावात असणारा पिता मुलांचा खांद्यावर हात टाकून चालू लागला. मुलींना वाऱ्यालाही थांबू न देणारा कर्मठ बाप लेकीला डोक्यावर घेऊन नाचू लागला. एकत्र कुटुंबात जाणीवपूर्वक जोपासली जाणारी निष्ठूरता आणि कर्मठता कमी झाली आणि पिता अधिक जवळचा वाटू लागला. आजचा पिता हा असा जवळचा मित्र आहे. एका पिढीचे अंतर असले तरी ते जाचक राहणार नाही, याची काळजी घेणारा आहे. मुलांसाठी सर्वस्व पणाला लावणारा आहे. त्यांच्यासाठी स्वर्ग निर्माण करण्याचे स्वप्न पाहणारा आहे. घरात संपन्नता नांदण्यासाठी स्वतः ला दावणीला बांधून घेणारा आहे. पण या सगळ्यात त्याचे स्वतःचे काय? त्याच्या स्वप्नांचे काय? त्याच्या मनाचे काय?

आज स्त्री सुपरवूमन झाल्याचे गोडवे गायले जातात. घर आणि ऑफिस सांभाळताना दाखवल्या जाणाऱ्या तारतम्याचे कौतुक केले जाते. मात्र हे कौतुक पुरुषांच्या वाट्याला येत नाही. वस्तूतः कुटुंबाचा भार सोसताना तोही सूपरमॅनच झालाय. आजकाल मुलांचे संगोपन ही कसोटी पाहणारी बाब ठरतीये. मुलांचे विश्व बदलते आहे, प्रलोभने वाढत आहेत. त्याबरोबर त्यांच्या मागण्याही वाढत आहेत. पूर्वी साध्या राहणीचे कौतुक होते. किमान गरजा भागवल्या तरी पुरुषाला 'कर्तृत्ववान' हे बिरुद लावले जायचे. साधी रहाणी आणि उच्च विचारसरणीचा बोलबाला होता. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. सेटस सिम्बॉल जपताना बापाची चांगलीच दमछाक होतीये. दारात मारुती असेल तर फोर्ड हवी असते. दर दिवशी नव्याने येणाऱ्या गॅझेटकडे आशाळभूतपणे पाहणाऱ्या नजरा त्याला सतावत असतात. एक मागणी पूर्ण होण्याच्या आतच दुसरी तयार असते. त्या पूर्ण करताना त्याची छाती भरुन येत असते.

आर्जव आणि लडिवाळता आता ठोस मागण्या आणि हट्टात परिवर्तीत झाले आहेत. घरातील सगळे डोळे स्वप्नं बघतात आणि बहुतांश घरांमध्ये ती पूर्ण करण्याची जबाबदारी पुरुषावरच येते. मुलांच्या शाळा प्रवेशापासून सुरु होणारी ही जद्दोजहद उच्च शिक्षण पूर्ण होईपर्यंत सुरु असते. भरमसाठ वाढलेले शिक्षणशुल्क, अवांतर खर्चाचे वाढते प्रमाण, चंगळवादी जीवनशैलीत वाढत असणाऱ्या मुलांच्या मागण्या, आपली अपुरी स्वप्ने त्यांच्या रुपाने पूर्ण होताना बघण्याची भाबडी आशा या सर्वात पिता नावाच्या प्राण्याची चांगलीच दमछाक होत आहे. त्यामुळे खरेच तो दमतोय. घराघरातला बाबा ही कोंडी अनुभवतोय.

स्त्री ही क्षणाची पत्नी आणि आयुष्यभराची माता असते तसेच पुरुषदेखील फार थोड्या काळासाठी नवरा आणि दीर्घकाळासाठी बावरा असतो असे म्हटले तर काय चुकीचे आहे? संसाराचा पहिला काळ पार पडला की त्याचे बावरेपण वाढतच जाते. 'मेजॉरिटी विन्स' या तत्वाप्रमाणे मायलेकांचे जमलेले सूत त्याचे बावरेपण आणखीनच केवीलवाणे करुन टाकते. कळत असूनही तो बोलू शकत नाही. सध्या अशा केविलवाण्या पित्यांची संख्या वेगाने वाढतीये. बाहेरच्या जगात मुलींकडे पाहण्याच्या विखारी दृष्टीची जाण असल्यामुळे तोकडे कपडे घालणाऱ्या मुलीला दटावणारा पिता प्रतिगामी, बुरसटलेल्या विचारांचा, थोडक्यात ऑर्थोडॉक्स ठरतो. फिटनेसची महती कळल्यामुळे आळशी मुलाला व्यायाम करण्यास सांगणारा पिता 'डोक्याची कल्हई' ठरतो. मोकळेपणा आणि स्वैराचार यातील सीमारेषा ओलांडली जातीये हे कळल्यानंतर सजग करणारा पिता मुलांना जाच करणारा वाटतो. त्यात पत्नीही मुलांना फितूर असेल तर विचारायलाच नको. पैसे मिळवणारे एक यंत्र, यापलीकडे त्याला फारशी किंमत रहात नाही. त्यातच अलिप्ततावादी धोरण पत्करणाऱ्या एकलकोंड्या घरात जवळच्या नातेवाईकांचीही वानवा असते. तेव्हा भावनेचा कोंडमारा होत असलेला हा पिता आतल्या आत धुसफुसत राहतो, रडत राहतो पण जगत राहतो.

आजच्या पित्याला पांढरे होऊ घातलेले केस रंगवत जगणे क्रमप्राप्त आहे. गळेकापू स्पर्धेमध्ये ऊर फुटेपर्यंत पळत राहण्यासाठी स्वतःला प्रेझेंटेबल ठेवणे गरजेचे आहे. जीवघेणी टार्गेट्स पूर्ण करत, नोकरी टिकवण्यासाठी बारा-चौदा तास काम करणे गरजेचे आहे, बदलत्या जमान्याबरोबर जुळवून घेण्यासाठी अपटूडेट राहणे गरजेचे आहे. प्रतिष्ठेची मानांकने बदलत असताना शक्य होईल तोपर्यंत पैसे कमावणे गरजेचे आहे. मागच्या पिढीने खांदापालट देऊन संसाराचा भार त्याच्या खांद्यावर ठेवला आहे आणि नव्या पिढीचे खांदे हा भार सोसण्यासाठी समर्थ होत नाहीत तोवर त्याला हा भार तोलून धरायचा आहे. पण त्या खांद्यांचा आधार मिळेलच याची शाश्वती नाही. पिल्लांना पंख फुटतील आणि ते दाणापाणी मिळवायला लागतील हे खरे. पण पंख फुटले की पाखरे दूरदेशी जाण्याच्या तयारीला लागतील हे तो मनोमन जाणून आहे. त्यामुळेच मुलांचे भविष्य घडवत असतानाच त्याला स्वतःचे भविष्य सुरक्षित ठेवायचे आहे. म्हणूनच आजचे पितृत्व अधिक धास्तावलेले आहे. फादर्स डेच्या निमित्ताने तरी अशा धास्तावलेल्या बाबांना आश्वस्त करायला हवे. ही भेटही त्यांच्यासाठी लाखमोलाची ठरेल.

आजकाल

# अतिरेक्यांचा बीमोड आणि काश्मिरींशी संवाद

जम्मू-काश्मीरमधील रियासी येथे भाविकांच्या बसवर दहशतवादी हल्ला झाला. यामध्ये दहा जणांना प्राण गमवावे लागले. जम्मू-काश्मीरला पडलेला हिंसाचाराचा विळखा काहीसा सैल झाला असेल; मात्र तो पूर्णपणे सुटलेला नाही, हे या घटनेतून पुन्हा एकदा समोर आले आहे. नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या शपथविधीच्या दिवशीच हा हल्ला घडविण्यात आला. दहशतवाद्यांच्या पाठीमागे असलेल्या शक्तींनी हल्ल्यासाठी निवडलेला दिवस नव्या सरकारला संदेश देण्यासाठीच होता, यात शंका नाही. अबू हमजा आणि त्याचा आणखी एक साथीदार, यांनी तो घडविल्याचे तपासात पुढे आले आहे. दोघेही परकीय असून याआधी राजौरी आणि पूंछमध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमध्ये त्यांचाच हात होता, असे सुरक्षा यंत्रणेकडून सांगण्यात येते. जम्मू-काश्मीरसाठी असलेले ३७०वे कलम मोदी सरकारच्या आधीच्या कार्यकाळात रद्द करण्यात आले. जम्मू-काश्मीरचे वेगळेपण जपण्याऐवजी फुटिरतावाद पसरविण्यासाठी त्या कलमाचा वापर झाला. ते करण्यात अग्रभागी असलेल्या तेथील राजकीय नेत्यांच्या बरोबरीने पाकिस्तानही अस्वस्थ झाला. त्यातच अलीकडच्या काळात व्याप्त काश्मीरमधून पाकिस्तान सरकार आणि पाकिस्तान लष्कर यांना विरोध वाढत चालला आहे. तेथील नागरिकांचा रोष एवढ्या टोकाला पोहोचला आहे, की रस्त्यावर उतरुन आंदोलन, निदर्शने होत आहेत आणि सीमा खुली करण्याची मागणी केली जात आहे. अन्यवेळी



सीमेपलीकडील काश्मीरमधील निदर्शने, आंदोलने याचा आनंद आणि त्याचा फायदा घेत आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतविरोधात गरळ ओकण्यात पाकिस्तान पुढे होता. व्याप्त काश्मीरमध्ये निदर्शनांना सुरुवात झाल्यावर जम्मू-काश्मीरमध्ये हिंसाचाराच्या घटनांमध्ये सातत्य राखणे ही त्या देशाची गरज बनली आहे. यातूनच जम्मू-काश्मीरमधील हिंसाचार पूर्णपणे रोखता येणे आव्हानात्मक बनत गेले आहे. हिंसाचारात अधिकाधिक जीवितहानी व्हावी, म्हणूनच प्रवाशांच्या बसला लक्ष्य करण्यात आले, हे उघड आहे. शिवखोरी मंदिरातून सर्व भाविक वैष्णोदेवी मंदिराकडे निघाले होते. काही काळापूर्वी पूंछमधील डेरा की गली या परिसरात दहशतवाद्यांनी जवानांच्या ताफ्यावर हल्ला केला होता. त्या ताफ्यातील रायफलींचा वापर रियासीत हल्ला करताना करण्यात आल्याचा संशय आहे. जम्मू-काश्मीरमध्ये शांतता निर्माण झाली नसली तरी पर्यटकांची पावले पुन्हा तेथे वळली, ही वस्तुस्थिती. ती फुटिरतावाद्यांना खटकणारी असल्याने अशा हल्ल्यांचा धोका पुढच्या काळातही कायम राहतो, हे लक्षात घ्यावे लागेल. स्थानिक नेत्यांपैकी अनेक जण पाकिस्तानच्या सुरात सूर मिळविणारे, हे जम्मू- काश्मीरमध्ये कमी-अधिक प्रमाणात कायम राहिलेले चित्र. यामुळे सर्वाधिक जबाबदारी येते ती सुरक्षा दलांवर. राजकीय इच्छाशक्ती, स्थानिक नागरिकांचे सहकार्य आणि सुरक्षा दलांची दक्षता हे सर्व एकत्र येते तेव्हाच आव्हानातून मार्ग काढता येतो. जम्मू-काश्मीरमध्ये तसे नाही. ज्यांना जम्मू-काश्मीरमधील प्रमुख नेते मानले जाते त्या पीडीपीच्या मेहबूबा मुफ्ती, नॅशनल कॉन्फरन्सचे उमर अब्दुल्ला यांचा लोकसभा निवडणुकीत दारुण पराभव झाला. हे दोघे बरे म्हणता येतील असा अपक्ष उमेदवार अब्दुल रशीद तेथे निवडून आला आहे. फुटिरतावादाचे उघड समर्थन त्याच्याकडून केले जाते. बारामुल्ला मतदारसंघातून उमर अब्दुल्ला यांना पराभूत करून तो निवडून आला आहे. याचाच अर्थ मतदानाच्या वाढलेल्या टक्केवारीवर काश्मीरमधील शांतता ठरणार नाही, हे स्पष्ट झाले. काश्मीर खोऱ्यात पूर्वी दहशतवाद्यांचे हल्ले अधिक प्रमाणात होत होते. पूंछ आणि राजौरी या भागात हल्ल्यांची संख्या वाढली असून घुसखोरीला आळा बसलेला नाही, हे त्यातून दिसते. सर्वसामान्य नागरिकांची सहानुभूती दहशतवाद्यांना मिळू नये यासाठी केंद्राने संवादावर भर देणे आवश्यक आहे. त्याचवेळी दहशतवाद्यांबाबत कठोर भूमिका ठेवून त्यांचा पूर्ण बीमोड, हेच उद्दिष्ट ठेवावे लागेल.

लोकसंसद

### पावसाने क्रिकेटरसिकांच्या आनंदावर विरजण

अमेरिकेतील डॅलस, न्यूयॉर्क आणि फ्लोरिडा तसेच वेस्ट इंडीजच्या कॅरिबियन बेटांवरील बार्बाडोस, अँटिग्वा, गयाना, सेंट लुसिया, त्रिनिदाद आणि सेंट व्हिन्सेंट या नऊ ठिकाणी खेळवल्या जात असलेल्या आयसीसी टी-२० विश्वचषक २०२४ स्पर्धेमध्ये आतापर्यंत ३५ सामने पार पडले आहेत. या सामन्यांमधून 'सुपर एट' फेरीमध्ये भारत, इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, अफगाणिस्तान, वेस्ट इंडिज, अमेरिका आणि दक्षिण आफ्रिका या सात संघांनी प्रवेश केला असून आठवा संघ कोणता हे लवकरच कळेल. मात्र या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेकडे क्रिकेट विश्वातील सर्व क्रिकेटरसिकांचे डोळे लागून राहिले असताना तेथील पावसाने त्यांच्या आनंदावर विरजण टाकले आहे. या स्पर्धेतील चार सामने पावसाने वाहून गेल्यामुळे गुणतालिकेत मोठा फरक पडला आणि त्यामुळे न्यूझीलंड, पाकिस्तानसारखे बलाढ्य संघ स्पर्धेबाहेर फेकले गेले. वास्तविक १ जून ते ३० नोव्हेंबर या कालावधीत वेस्ट इंडीजमधील अनेक कॅरिबियन बेटांना समुद्री चक्रीवादळाचा तडाखा बसत असतो. त्यामुळे या काळात या बेटांवर पावसाची रिपरिप सतत चालूच असते. अशावेळी खरे तर या काळात या ठिकाणी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करणे चुकीचे आहे. मात्र सोन्याची अंडी देणाऱ्या 'आयपीएल'ला वर्षातला प्राईम टाइम देणाऱ्या आयसीसीला हे कोण समजवणार?

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**१७ जून**

**१२९७:-** शके १२१९ ज. व. १२ रोजी संत निवृत्तीनाथ समाधिस्त. संत ज्ञानेश्वरांचे ते थोरले बंधू. **१८६४:-** काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांचा जन्म. २५ मार्च १८९८ रोजी 'काळ' पत्र त्यांनी सुरु केले. त्यातील त्यांचे जहाल लेखन ब्रिटिशांना 'कर्दनकाळ' ठरले. अखेर त्यावर त्यांनी बंदी आणली. काळ पत्रातून त्यांनी हजाराहून अधिक लेख लिहिलेत. यातील 'काळातील निवडक निबंध भाग १ ते १० प्रसिध्द झालेत. वाचकांच्या भावनांना आवाहन करण्याची मोठी शक्ती या निबंधात होती. उत्कट देशाभिमान, ज्वलंत स्वातंत्र्याकांक्षा' आदी वाचकांच्या हृदयाला वेध लावणारी काव्यमयता या गुणांमुळे त्यांचे निबंध मनाची पकड घेतात. याशिवाय 'तर्कसंग्रह व तर्कदीपिका','तर्कभाषा' ही संस्कृतवरुन भाषांतर केलेली पुस्तके, 'अर्थसंग्रह' हा ग्रंथ रुसोच्या तत्वज्ञानाच्या 'सोशल कॉन्ट्रक्ट' या ग्रंथाचे भाषांतर काही पौरोणिक नाटके, 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' आदींवर त्यांनी लिखाण केले आहे. **१८६७:-** सत्यशोधक समाजाचे एक आधारस्तंभ, समाजसुधारक आणि ब्राह्मणेतर चळवळीचे प्रवर्तक भा. वि. जाधव यांचा जन्म. त्यांची साहित्यिक कामगिरी म्हणजे प्रचलित रुढ विचारांना धक्के देणारे अनेक चर्चात्मक संशोधनात्मक लेख त्यांनी लिहिले. 'मराठे व त्यांची भाषा' हा त्यांचा एक गाजलेला ग्रंथ. याशिवाय 'रामायणावरील नवा प्रकाश' हा त्यांचा आणखी एक महत्त्वपूर्ण ग्रंथ. **१८९५:-** बुध्दिप्रामाण्यवादी लेखक, सुधारकाग्रणी विचारवंत गोपाळ गणेश आगरकर यांचे वयाच्या अवघ्या ३९व्या वर्षी निधन. 'केसरी'चे संपादक आणि 'सुधारक' या वृत्तपत्राचे संस्थापक या भूमिकेतून आगरकरांनी 'इष्ट असेल ते बोलणार' अशा नेमस्त शब्दांत सत्ता वा समाजाची तमा न बाळगता लिहिण्याचा निर्धार केला. लोकमान्य टिळकांशी पुढे तीव्र मतभेद झाल्यावरही आगरकरांची मैत्री कायम होती. 'डोंगरीच्या तुरुंगातील आमचे १०१ दिवस' या छोटेखानी पुस्तकात टिळकांचा उल्लेख वारंवार आहे. 'कवी, काव्य व काव्यरति' तसेच 'वाक्यमीमांसा अर्थात वाक्यांचे पृथक्करण' असे लेखन त्यांना भाषा व साहित्याभ्यासात असलेल्या गतीची साक्ष देते. आगरकरांच्या निवडक निबंधाचे संपादित खंड उपलब्ध आहेत. **१९०२:-** क्रांतिकारक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पहिले सहकार्यवाह गोपाळ मुकूंद उर्फ बाळाजी हुद्दार यांचा जन्म. 'वांगीश्वरी' या नियतकालिकेचे ते संस्थापक संपादक. **१९१३:-** लेखक, नभोवाणी पाक्षिकाचे संपादन करणारे वामन वासुदेव चितळे यांचा जन्म. यांचा 'आंतरपोल' हा पोलिस कथासंग्रह आणि वैमानिक गुढकथा अशी पुस्तके प्रकाशित झाली आहेत. **१९३४:-** भारुड वाङ्‌मय एक चिकित्सा या विषयावर पीएचडी करणाऱ्या लेखिका, कथाकार, कवी डॉ. सौ. कुंदा जगदाळे यांचा जन्म. 'संगत', 'स्पंदन', 'श्वासातील सुगंध' या काव्यसंग्रहासह सो हं! हे चित्रकाव्य. 'स्पर्शकल्लोळ' ही दीर्घकथा. डॉ. जगदाळे मामांची जीवनगाथा चरित्र. 'वेगळी वाट' ही तरुण मनाचा मागोवा घेणारी कादंबरी. 'उमाळे स्त्री हृदयाचे' हे संशोधनात्मक लेखन. 'मराठी मुस्लिम ओव्या' यातून तौलानिक अभ्यास आणि 'भूक' हा कथासंग्रह. 'गाथा स्त्री मुक्तीची व कर्मयोगी' हे संपादित आणि 'गुलमोहर', 'कल्पतरु' हे संयुक्त आत्मचरित्र (पूर्वार्ध व उत्तरार्ध) व प्रसिध्द अशी साहित्य संपदा. **१९३९:-** लेखक, कृषी वनस्पतीशास्त्राचे जाणकार प्रा. नारायण नत्थुजी पोतकिले यांचा जन्म. 'वनस्पती शरीरक्रियाशास्त्राची मुलतत्त्वे' ह्या ग्रंथाचे ते सहलेखक. **१९४०:-** उर्दू भाषेत जाणकार लेखक, गझलकार डॉ. विनय वाईकर यांचा जन्म. 'आईना-ए-गझल' हा उर्दू मराठी कोश, 'रक्तरंग (युध्द कथा)', 'संकल्प' हे नाटक, 'फौजी', 'लोखंडी पूल' हे कथासंग्रह तसेच 'कलाम-ए- गालिब' हे गालिबच्या गझलांचे मराठी भाषांतर अशी साहित्य संपदा. **१९४१:-** प्रतिभासंपन्न साहित्यिक अरुण साधू यांचा जन्म. विज्ञानाची पदवी संपादन करणाऱ्या साधूंनी पत्रकारीतेची सुरुवात केसरीतून केली. कालांतराने विविध इंग्रजी वर्तमानपत्रातून सुध्दा काम केले. मूळ पिंड पत्रकारितेचा असल्याने लेखनातून राजकीय घडामोडींवर भाष्य अधिक. याची प्रचिती 'सत्तांध', 'बहिष्कृत', 'स्फोट', 'शापित', 'झिपऱ्या', 'शोधयात्रा', 'तडजोड' आदी कादंबऱ्यांतून येते. 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' या त्यांच्या कादंबऱ्यावर निघालेले चित्रपटही गाजले. 'आणि ड्रॅगन जागा झाला' हे माणूस मधील सदरही त्यांचे गाजले. याशिवाय 'एक माणूस बुडतो त्याची गोष्ट', 'बिन पावसा-चा दिवस', 'मुक्ती', 'मंत्रजागर' हे त्यांचे कथासंग्रह तर 'घम' हे त्यांचे गाजलेले नाटक. तसेच काही अनुवादीत साहित्यही त्यांच्या नावावर आहे. **१९४२:-** पत्रकार, संपादक, कादंबरीकार श्रीनिवास भिकाजी सरदेसाई यांचे निधन. 'नाट्यकथार्णव' या मासिकाचे आणि 'राष्ट्रमन' या साप्ताहिकाचे संपादक म्हणूनही काम केले. तसेच 'पुणे वैभव' चे संपादक ही ते होते. सरदेसाईंचे मराठी साहित्याला योगदान असे की त्यांनी परक्या भाषेतील चांगले लेखन मराठी वाचकांना अद्भुत आणि कल्पनारम्य कादंबऱ्यांचा प्रभाव कमी व्हावा यासाठी त्यांनी लेखन केले. या लेखनात त्या काळातील लंडन शहराचे सर्वांगीण दर्शन घडविणारी रेनॉल्डसच्या मिस्टिज ऑफ लंडन चा अनुवाद लंडन रहस्य या नावाने केला. याशिवाय पाणी (गुणधर्म, पदार्थ विज्ञान) हे त्यांचे आणखी एक प्रसिध्द पुस्तक याशिवाय पुष्कळ लेखन तत्कालिन मासिक, साप्ताहिक आणि वृत्तपत्रातून त्यांनी केले होते.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

# कर्जत-मुरबाड महामार्गावर खोदकाम

## सरकारी विभागांच्या परवानग्यांचा विसर



**। नेरळ । वार्ताहर।**
**कर्जत तालुक्यात अनेक ठिकाणी विना परवानगी मोठ्या प्रमाणावर रस्ता खोदून केबल वायफाय टाकण्याचे काम सुरू असल्याचे दिसून येत आहे. रस्ता खोदण्यापूर्वी एमएसआरडीसी, जल व्यवस्थापन विभाग कर्जत, फॉरेस्ट डिपार्टमेंट यांची कोणतीच परवानगी घेण्यात आलेली नाही. दरम्यान, या प्रकरणी लवकरात लवकर कार्रवाई करावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेड कर्जत तालुकाध्यक्ष विशाल माळी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.**

कर्जत ते मुरबाड राष्ट्रीय महामार्ग ५४८ अ या रस्त्यालगत साईडपट्टी खोदून वायफाय केबल टाकण्याचे काम दोन अज्ञात कंपन्या करीत आहेत. हे केबल नदीच्या भागातून टाकण्यात येत आहेत. तसेच फॉरेस्टच्या जागेतून आणि रस्त्याच्या साईड पट्ट्यात देखील टाकण्यात येत आहेत. दरम्यान, संबंधित तिन्ही विभागांची परवानगी त्यांच्याकडे नाही आणि त्यांच्याकडे चौकशी केली असता कोणत्याही प्रकारचे एमएसआरडीसी, जल व्यवस्थापन विभाग कर्जत, फॉरेस्ट डिपार्टमेंट यापैकी एकाकडूनही ना हरकत किंवा परवानगी त्यांच्याकडे आढळून आलेली नाही. तरी अशा बेकायदेशीर काम करणाऱ्या कंपन्या आणि ठेकेदार यांची चौकशी करून गुन्हे दाखल करण्यात यावेत आणि काम थांबविण्यात यावे. रस्त्याच्या दुतर्फा केलेल्या खोदाईमुळे पावसाळ्यात अपघाताची शक्यता आहे. होऊ शकते, यामुळे मनुष्यहानी होऊ शकते. याची काळजी घेतली गेलेली नाही, तर अशा ठेकेदाराने कोणतीही परवानगी न घेता काम केले असल्यास त्यावर योग्य ती चौकशी करून दोषी आढळल्यास फौजदारी कारवाई करण्याची मागणी केली आहे. अशा अतिसंवेदनशील विषयांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष घालून काम त्वरित बंद करावे. अन्यथा संभाजी ब्रिगेड तीव्र आंदोलन करेल, असा इशारा देखील या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे कर्जत तालुका अध्यक्ष विशाल माळी, श्रीकांत आगीवले, तीर्थेश शिंदे, गणेश पाटील, देवराम पवार, वैभव भुईकोट, नरेश देशमुख आदी पदाधिकारी उपस्थित होते.

> **रस्त्याच्या साईटपट्टीचा काहीभाग राईट ऑफ वे असल्याने ठेकेदाराला त्याबाबत काही परवानगी आहे का ? याची माहिती घेऊन तसेच वनविभागाच्या जागेत त्यांनी कुठे व किती प्रमाणात खोदकाम केले आहे. त्याची प्रत्यक्षरित्या पाहणी करून दोषी असल्यास योग्य ती कारवाई केली जाईल.**
> **संदीप पाटील**
> **कार्यकारी अभियंता, एमएसआरडीसी**

## दारुच्या नशेत मजूराला मारहाण

**महाड :** दारूच्या नशेत क्षुल्लक कारणावरून एका मजुरास बांबूने जबर मारहाण करून त्याचा जीव घेण्याचा प्रयत्न केल्याची घटना नुकतीच महाड शहर हद्दीत घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, देवा शंकर राठोड (वय ४२) राहणार नातेखिंड महाड हा मजूर गुरुवारी, १३ जून रोजी रात्री ११.३० वाजण्याच्या सुमारास नातेखिंड येथे उभा असताना तेथे दारू पिऊन आलेल्या प्रमोद गोपीनाथ पार्टे (वय ५२ रा.तळोशी महाड) याने राठोड यास शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. याबाबत हटकले असता त्याने मजूराला मारहाण केली.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ जून

१) श्रीम. विजया गजानन चव्हाण चेंढरे, अलिबाग, १७-६-१९३४
२)श्रीम.कांता मगनलाल भारद्वाज अलिबाग, १७-६-१९३६
३)श्रीम.शशिकला पांडुरंग कांबळी घरत आळी, अलिबाग १७-६-१९४२
४)श्री.लिलाधर नरहरि पाटील मु.बांधण, अलिबाग १७-६-१९४४
५)श्री.चंद्रकांत बाळाराम पाटील अलिबाग, १७-६-१९५२


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


## टोमॅटोच्या दरात वाढ



**नवी मुंबई :** गेल्या चार ते पाच महिन्यापासून स्थिर असलेले टोमॅटोच्या दराने उसळी घेण्यास सुरुवात केली आहे. किरकोळ आणि घाऊक बाजारात टोमॅटोचे दर वधारले आहेत. परराज्यातून आणि महाराष्टातुन होणारी टोमॅटोची आवक कमी झाल्याने टोमॅटोचे भाव वाढले असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

आवक कमी आणि मागणी जास्त यामुळे दरवाढ झालेली आहे. मागील आठवड्यात २ हजार क्विंटलहुन अधिक टोमॅटो दाखल होत होते. ते आता १ हजार ८०० क्विंटल दाखल होत आहेत. पावसामुळे उत्पादन खराब होते तसेच शेताततून उत्पादन घेण्यास अडचणी येत आहेत, त्यामुळे बाजारात आवक कमी झाली आहे. महाराष्ट्रतुन सातारा, सांगली आणि संगमनेर तर बंगळूरमधून टोमॅटो दाखल होतात. मागील वर्षी जुलैमध्ये टोमॅटोच्या दराने उच्चांक गाठला होता. किरकोळ बाजारात १५० ते १८० रुपयांवर तर घाऊक बाजारात १०० ते ११० रुपयांपर्यंत पोहोचले होते. मात्र ऑगस्टनंतर टोमॅटोचे दर उतरले होते. ते आतापर्यंत टोमॅटोचे दर आवाक्यात होते. मात्र आता पुन्हा टोमॅटोच्या दाराने उसळी घेतली असून घाऊक बाजारात प्रतिकिलो २८ ते ३२ रुपये तर किरकोळ बाजारात ८० रुपयांनी विक्री होत आहेत.

## विशेष लोकअदालत सप्ताहाचे आयोजन

### २९ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत

**। रायगड । वार्ताहर ।**
२९ जुलै ते ३ ऑगस्ट या काळात विशेष लोक अदालत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस राजदेकर व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने सचिव अमोल शिंदे यांनी केले आहे.

न्यायालयातील तडजोड पात्र प्रलंबित प्रकरणे आपसी मामजस्यांतून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकरिता लोक अदालत हे प्रभावी माध्यम म्हणून समोर आले आहे. लोक अदालतीच्या माध्यमातून अनेक पक्षकारांनी आपली प्रकरणे तडजोडीद्वारे निकाली काढली आहेत. लोक अदालतीमध्ये तडजोडीदार निकाली निघालेल्या प्रकरणांमुळे प्रस्तावित प्रकरणातील पक्षकार याच्यासोबतच शासन आणि समाज या दोन्ही घटकांना मोठा लाभ प्राप्त झाला आहे.

लोक अदालतीमुळे न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्यामध्ये मोठ्या प्रमाणात यश आले आहे. लोक अदालतीचे यश लक्षात घेऊन सर्वोच्च न्यायालयाने प्रलंबित असलेली तडजोडपात्र प्रकरणे जलद गतीने निकाली काढण्याकरिता विशेष लोक अदालत सप्ताहाचे आयोजन २९ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत केले आहे.

प्रलंबित प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी पहिल्यांदाच असा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हयातील ज्या पक्षकारांची प्रकरणे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यांच्याकरिता आपली प्रकरणे आपसी समन्वयातून तडजोडीद्वारे निकाली काढण्याकारिता ही एक सुवर्णसंधी सर्वोच्च न्यायालयाने उपलब्ध करून दिली आहे.

## बसस्थानकात भटकी कुत्री

**अलिबाग :** एसटी बस आगारातील स्थानकात भटक्या श्वानांचा वावर प्रचंड वाढला आहे. यामुळे प्रवाशांना स्थानकात जीव मुठीत घेऊन थांबावे लागत आहे. कधी श्वान अंगावर येतील याचा नेम नाही. अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. येथे सर्व शासकीय व खासगी महत्त्वाची कार्यालये आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी अलिबाग, वरसोली येथील समुद्रकिनारे, कुलाबा किल्ला पर्यटकांच्या पसंतीचा आहे. पर्यटकांची वर्दळ अधिक आहे. नोकरी व्यवसायानिमित्त येणाऱ्या-जाणाऱ्यांची संख्या अधिक आहे. प्रशासनाने यावर उपाय योजना करणे गरजेचे आहे.

## ऐन पावसाळ्यात नवी मुंबईकरांवर जलसंकट

**। नवी मुंबई । वृत्तसंस्था ।**
कोकणपट्टीत पावसाला सुरुवात झालेली असतानाच नवी मुंबईकरांवर मोठ्या पाणीकपातीचे संकट कोसळले आहे. आता नव्या निर्णयानुसार नवी मुंबईतील प्रत्येक विभागात आठवड्यातील तीन दिवस संध्याकाळी पाणीपुरवठा बंद करण्यात आला आहे. नवी मुंबईकरांना मोरबे धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, मोरबेच्या पाणीसाठ्यात लक्षणीय घट झाल्याने महापालिका प्रशासनाने पाणीकपात आणखी मोठी करण्याचा निर्णय घेतला आहे. मोरबे धरणात मुबलक पाणीसाठा होईपर्यंत बेलापूर, नेरुळ, तुर्भे, वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोली आणि सिडको नोडमध्ये ही पाणीकपात शुक्रवारपासून (१४ जून) लागू करण्यात आली आहे. यापूर्वी पावसाचे आगमन गृहित धरुन महापालिकेने ४ जूनपासून नोडप्रमाणे आठवड्यातून



२ दिवस पाणीपुरवठा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. पण, मोरबे धरणातील साठ्यात होत असलेली घट आणि अपेक्षेप्रमाणे पाऊस न पडल्याने आता आठवड्यातून ३ दिवस नोडनिहाय पाणीपुरवठा बंद ठेवण्याची वेळ नवी मुंबई महापालिकेवर आली आहे. त्यामुळे नवी मुंबईकरांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन महापालिकेचे अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे यांनी केले आहे. नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या म ोरबे धरण परिसरात पाऊस अत्यल्प पडला आहे. त्यातच उष्णतेमुळे धरणातील पाणी साठ्यात कमालीची घट होत असल्याने नवी मुंबईकरांची आणि महापालिकेची चिंता वाढली आहे. आता पावसाने दडी मारली किंवा पुरेशा प्रमाणात पडला नाही तर आणखी मोठ्या प्रमाणात पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. उपाय म्हणून महापालिकेने पाणी पुरवठ्यामध्ये कपात करण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जाते.

## जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची बैठक

**। खास प्रतिनिधी । रायगड ।**
बकरी ईद कालावधीत उच्च न्यायालयाकडील ५ जुलै २०२२ च्या न्यायनिर्देश व महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा २०१५ प्राणी क्लेश कायदा १९६० वाहतूक नियम म धील तरतुदीचे पालन करणे गरजेचे आहे. या कालावधीत जिल्ह्यात या नियमांची अंमलबजावणी करून सुव्यवस्था राखण्याच्या सुचना जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची बैठकीत देण्यात आल्या.



अलिबाग जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात आयोजित बकरी ईदच्या अनुषंगाने जिल्हा प्राणी क्लेश प्रतिबंधक समितीची बैठक निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीस नवी मुंबई पोलीस उपयुक्त ए. एल. राजपूत, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बी. ए. माळवे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त तथा सदस्य सचिव प्राणी क्लेश प्रतिबंधक समिती डॉ. सचिन देशपांडे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र प्राणी रक्षण कायदा १९७६ (सुधारणा १९९५) तसेच प्राणी क्लेश प्रतिबंधक कायदा १९६० अन्वये अंमलबजावणी करण्याकरिता अधिनियमातील तरतुदी बाबत माहिती दिली. रायगड जिल्ह्यामध्ये बकरी ईद निमिताने काही प्रमाणावर कुर्बानीसाठी जनावरांची वाहतूक होत असते. वाहतुकीचे नियम मोडून प्राण्यांची वाहतूक होण्याची शक्यता असल्याने नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीत तपासणी नाक्यावर पशुवैद्यकीय अधिकातऱ्याची नेमणूक केल्याचे जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्तांनी सांगितले. ४ मार्च २०१५ पासून सुधारीत अधिनियमांप्रमाणे गार्यीची, वळूची व बैलाची कत्तल करण्यास मनाई आहे. तसेच सदर अधिनियमातील नियम ५ अन्वये गाय, वळू व बैल या प्राण्यांची कत्तल, कत्तलीसाठी वाहतुक, कत्तलीसाठी निर्यात, कत्तलीकरीता खरेदी-विक्री, कत्तलीकरीता विल्हेवाट करण्यास मनाई आहे.

केंद्र शासनाच्या, २००१ मधील नियम ३ अन्वये गर्भधारणा केलेले पशु, ३ महिन्यांपेक्षा कमी वयाचे पशु, सक्षम अधिकाऱ्यांने कत्तलयोग्य असे प्रमाणिकरण न केलेले पशु यांच्या कत्तलीस प्रतिबंध असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## कृषी संजीवनी मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन

**। अलिबाग । वार्ताहर ।**
डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या १२५ वी जयंतीनिमित्ताने कृषी संजीवनी पंधरवडा १७ जून ते १ जुलै या कालावधीत उपविभागातील अलिबाग, पेण व मुरुड तालुक्यामध्ये राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन उपविभागीय कृषी अधिकारी कैलास वानखेडे यांनी केले.

कृषी विभागाचे अधिकारी, कृषी विद्यापिठाचे शास्त्रज्ञ, कृषी विषयातील तज्ञ, प्रगतशील शेतकरी हे शेतकऱ्यांना परिपूर्ण मार्गदर्शन करणार आहेत. १७ जून बीज प्रक्रिया जनजागृती दिन, १८ जून पी.एम. किसान उत्सव दिवस, १९ जून जमिन सुपिकता जागृतीदिन, २० जून गुणवत्तापूर्ण निविष्ठांची ओळख दिन, २१ जून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग लागवड व तंत्रज्ञान प्रसार, २२ जून पिक विमा जनजागृती दिन, २३ जून हवामान अनुकूल शेती तंत्रज्ञान प्रसार दिन, २४ जून नाविन्यपूर्ण उपक्रम, सेंद्रीय शेती, नैसर्गिक शेती तंत्रज्ञान २५ जून भात व नागली लागवड तंत्रज्ञान दिन, २६ जून रोजी तूर-कडधान्य लागवड तंत्रज्ञान दिन, २७ जूनला कृषी महिला शेतकरी सन्मान दिन, २८ जून पिकांची कीड व रोग नियंत्रणाच्या उपाययोजना, २९ जून शेतकरी मासिक वाचन दिन व वर्गणीदार वाढविणे, ३० जून रोजी प्रगतशील शेतकरी संवाद दिन, १ जुलै या कृषी दिनी संजिवनी सप्ताहाची सांगता आहे. लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

## निवृत्त शिक्षकांना मानधनाची प्रतीक्षा

**। अलिबाग । वार्ताहर।**
रायगड जिल्हा परिषदेने गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांची मानधनावर नियुक्ती केली होती. त्यानंतर शिक्षकांनी त्यांची जबाबदारी पार पाडली पण जिल्हा परिषदेला मानधन देण्याची जबाबदारी पार पाडा आली नाही. त्यामुळे आमचे मानधन केव्हा मिळेल, असा सवाल हे निवृत्त शिक्षक करत आहेत.

संपूर्ण रायगड जिल्ह्यात मानधनावर किती शिक्षक आहेत, हे स्पष्ट झालेले नाही. तरीही ही संख्या शंभरहून अधिक असल्याचो बोलले जाते. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांम ध्ये शिक्षकांच्या जागा रिक्त होत्या. शिक्षकांची भरती होत नसल्यामुळे दर महिना २० हजार रुपये मानधनावर सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करण्याचा निर्णय झाला. तशी जाहिरात प्रसिद्ध करून डिसेंबर २०२३ पासून शिक्षकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. प्रथम शिक्षण विभागाने या शिक्षकांचे नियुक्ती पत्र गट विकास अधिकाऱ्यांच्या सहीने गट शिक्षण अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) यांच्या कार्यालयामार्फत पाठवण्यात आले. डिसेंबर २०२३, त्यानंतर जानेवारी २०२४ चे मानधन न मिळाल्याने शिक्षकांची चलबिचल झाली. याबाबत मानधनावर काम करणारे निवृत्त मुख्याध्यापक अजय पाटील यांनी शिक्षण अधिकारी (प्राथमिक), शिक्षण विभाग, रायगड जिल्हा परिषदेचे सीईओ, गट विकास अधिकारी, गट शिक्षण अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) यांना प्रत्यक्ष भेटून तसेच निवेदन दिले. त्यानंतरही काही झाले नाही. मग त्यांनी या सर्व तक्रारींची प्रत मुख्यमंत्री कार्यालय, अलिबाग कक्षात दिली. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांना जाग आली.

फेब्रुवारीपर्यंतचे मानधन एप्रिल अखेरीस अनेक पाठपुराव्यानंतर जमा झाले. त्यानंतर मार्च, एप्रिल आणि मे या तीन महिन्यांचे या शिक्षकांचे मानधन रखडले आहे. तातडीने मानधन अदा करावे, अशी मागणी केली आहे.

## फ्लेमिंगोला ड्रोनचा धोका, सीएमचे गृह विभागाला निर्देश

**। मुंबई । वार्ताहर।**
नवी मुंबईतील पाणथळ प्रदेशात विसावलेल्या फ्लेमिंगोचे छायाचित्रण करण्यासाठी ड्रोनचा वापर वाढत आहे. याबाबत पर्यावरण प्रेमींकडून चिंता व्यक्त करण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्याच्या गृह विभागाला या समस्येकडे लक्ष देण्याचे निर्देश दिले आहेत.

नॅटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी एन कुमार यांनी मुख्यमंत्र्यांकडे याबाबत तक्रार केली आहे. सर्वांपेक्षा वेगळी व विस्मयकारक सुंदर चित्रे आणि रील्स सोशल मीडियावर फिरत आहेत, परंतू वन्यजीव छायाचित्रकारांनी लक्षात घेतले पाहिजे की ड्रोन पक्ष्यांसाठी धोकादायक आहेत, असे नॅटकनेक्टने म्हटले आहे. वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अंतर्गत समाविष्ट असलेले फ्लेमिंगो हे अतिशय संवेदनशील पक्षी आहेत आणि त्यांना ड्रोनवरील ब्लेडने दुखापत होऊ शकते किंवा ते मारले जाऊ शकतात. त्यामुळे फोटोग्राफी करणाऱ्यांनी ड्रोनचा वापर करू नये. नॅटकनेक्टने केलेल्या मागणीनुसार मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने ई-मेलद्वारे सुजाता सौनिक, अतिरिक्त मुख्य सचिव-गृह विभाग यांना या समस्येकडे लक्ष देण्यास आणि कारवाई करण्यास सांगितले आहे. चिंताजनक गोष्ट म्हणजे ड्रोन पक्षी उडत असतानाही त्यांचा जवळून पाठपुरावा करतात. ड्रोनमधून येणारा आवाजही धोकादायक आहे. ठाणेखाडी फ्लेमिंगो अभयारण्यात भरतीच्या पाण्याची पातळी वाढल्यावर टीएस चाणक्य, एनआरआय आणि डीपीएस फ्लेमिंगो अधिवास क्षेत्रामध्ये उतरणाऱ्या पक्ष्यांना ड्रोन त्रास देतात. अशाप्रकारे, नवी मुंबईचे मोठे जलस्रोत ठाणे खाडी फ्लेमिंगो अभयारण्यच्या उपग्रह ओल्या जमिनी म्हणून काम करतात. काही नागरिक पक्ष्यांचा पाठलाग करण्यासाठी त्यांच्यावर दगडफेक करतात.



एकदा पक्षी येथे उतरणे बंद झाले की, काही लोक दावा करू शकतात की जलकुंभ आता फ्लेमिंगोचे निवासस्थान नाहीत आणि म्हणून ही क्षेत्रे विकासासाठी खुली करा, अशी मागणी होऊ शकेल असा इशाराही पर्यावरण प्रेमींनी दिला आहे. यावर तातडीने उपाय योजना करण्याची गरज असल्याकडेही त्यांनी लक्ष वेधले आहे.

## दुरूस्तीचे काम अंतिम टप्प्यात

**रत्नागिरी :** सागरी महामार्गावरील सिंधुदुर्ग-रत्नागिरी या दोन जिल्ह्यांना जोडणारा राजापूर तालुक्यातील दांडे-अणसुरे पुलाच्या दुरूस्तीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे.येत्या पंधरा दिवसात हे काम पुर्ण होवून हा पुल वाहतुकीस खुला करण्यात येणार आहे. पावसाळयात या पुलावरून वाहतुक सुरू करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. त्यामुळे जनतेची होणारी गैरसोय दूर होणार आहे.

## शामराव पेजे आर्थिक विकास महामंडळाच्या विविध योजना

**। रायगड । वार्ताहर ।**
राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय आर्थिक विकास या महामंडळाची स्थापना केली आहे. समाजातील इतर मागासवर्गीयांच्या आर्थिक उन्नतीसाठी या महामंडळामार्फत स्वयंरोजगाराच्या विविध कर्ज योजना राबविण्यात येतात.

छोटे व्यवसायिक व स्वयंरोजगाराकरिता रु.१ लाखाची थेट कर्ज योजना नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज नाही व २० टक्के बीज भांडवल योजना. तसेच ऑनलाईन योजनांमध्ये वैयक्तिक कर्ज योजना परतावा योजना रु.१० लाखांपर्यंत गट कर्ज व्याज परतावा योजना (रु.१० लाख ते ५० लाख पर्यंत) या योजनांचा समावेश आहे.

थेट कर्ज योजना व २० टक्के बीज भांडवल योजना (भौतिक उद्दिष्ट ४९) या योजनांचे अर्ज शामराव पेजे कोकण इतर मागासवर्गीय महामंडळाच्या रायगड जिल्हा कार्यालयात स:शुल्क उपलब्ध आहेत.

**रु.१ लाख थेट कर्ज योजना-** सिबिल क्रेडिट स्कोर किमान ५०० असलेल्या लाभार्थ्यांना हे कर्ज महामंडळातर्फे दिले जाते. कर्ज परत फेडीचा कालावधी ४ वर्षे आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा १८ ते ५५ वर्षे आहे. कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थ्यांना व्याज आकारण्यात येणार नाही. मासिक हप्ता २ हजार ८५ रुपये आहे.

**२० टक्के बीज भांडवल योजना-** कर्जाची उच्चतम मर्यादा रु. ५ लाख पर्यंत आहे. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे आहे. अर्जदाराच्या वयाची मर्यादा वय १८ ते ५० वर्षे आहे. बँकेमार्फत लाभार्थ्यांना ७५ टक्के कर्ज उपलब्ध केले जाते. यामध्ये लाभार्थ्यांचा सहभाग ५ टक्के, महामंडळाचा सहभाग २० टक्के, बँकेचा सहभाग ७५ टक्के महामंडळाच्या कर्ज रकमेवर व्याजाचा दर ६ टक्के असते.

या योजनांसाठी लागणारी कागदपत्रे :- पासपोर्ट साईज २ फोटो, तहसिलदार/नायब तहसिलदार यांनी दिलेला उत्पन्नाचा मूळ दाखला. (ग्रामीण व शहरी भागासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न १ लाख), सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र (इ.मा.व.), दरपत्रक (कोटेशन), प्रकल्प अहवाल, आधारकार्ड, पॅनकार्ड किंवा निवडणूक ओळखपत्र शिधापत्रिकेची झेरॉक्स, सिबिल क्रेडिट रिपोर्ट थेट कर्ज योजनेकरिता (स्कोर किमान ५०० असावा), स्थानिक स्वराज्य संस्थेचे (ग्रामपंचायत/नगरपालिका) व्यवसाय करण्याबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र, डोमिसाईल किंवा रहिवासी दाखला, आधारकार्ड लिंक केलेल्या पासबुकची झेरॉक्स, वयाच्या पुराव्यासाठी शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र/ जन्म तारखेचा दाखला. भाडेकरार किंवा संबंधित जागामालकाचे संमतीपत्र व व्यवसायाच्या जागेचा असेसमेंट उतारा इत्यादी कागदपत्रे लागतात.

# महामार्गावर सहा हजार कोटींचा चिखल

। रायगड । खास प्रतिनिधी ।

**गेल्या १२ वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाचे काम सुरु आहे. पहिल्याच पावसामध्ये महामार्गावर चिखल झाला आहे. त्यामुळे वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. ऐन पावसाळ्यात अतिशय दयनीय अवस्था झाल्याने नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. या कालावधीत सुमारे सहा हजार कोटी रुपये खर्च झाला असून गणेशोत्सवापूर्वी रस्ता सुसिस्थित करण्याची मागणी जोर धरत आहे.**





**ऐन पावसाळ्यात मुंबई-गोवा हायवेची दयनीय अवस्था**

गेली १२ वर्ष रखडलेला मुंबई-गोवा महामार्ग अद्याप अपूर्णच अवस्थेत आहे. रायगड जिल्ह्यातला बहुतांश भाग हा अर्धवट स्थितीतच असल्याचे पाहायला मिळत आहे. नागोठणे जवळील एका वळणावर या महामार्गाचे सूरु असलेले काम प्रवासी वर्गाला मात्र डोके दुःखी ठरत आहे. संपुर्ण रस्त्यावर चिखल झाल्याने येथील वाहन चालक आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करताना दिसत आहेत. ऐन पावसाळ्यात रस्त्यावर टाकण्यात आलेले मातीचे ढिगारे या संपूर्ण प्रकाराला कारणीभूत ठरत असून जणू अपघाताला आमंत्रणच देत असल्याचे चित्र आहे.

**वाहन चालकांचा जीव मुठीत घेऊन प्रवास**

रायगडमध्ये रखडलेला मुंबई-गोवा महामार्ग पायाभूत मूलभूत नागरी समस्या जैसे थेच असून आजवरचे लोकप्रतिनिधी या समस्या सोडविण्यात अपयशी ठरले आहेत. हे यातून स्पष्ट होत आहे. गेल्या आठवड्याभरापासून कोकणात जोरदार पाऊस सुरु आहे. या पावसामुळे मुंबई-गोवा महामार्गावर टाकलेल्या मातीचे रुपांतर चिखलात झाले आहे. या चिखलातून वाहनचालकांना वाट काढताना फारच त्रास सहन करावा लागत आहे. येथून प्रवास करताना अपघाताची भीतीही आहे. मागील अनेक वर्षांपासून काम रखडलेलेच पाहायला मिळत असल्याने नाराजीचा सूर आहे.

## दुरुस्तीच्या कामासाठी १९२ कोटी रुपये खर्च

**केंद्र सरकार आणि महाराष्ट्र पीडब्ल्यूडी या दोघांकडून आरटीआय कायद्यांतर्गत या वर्षाच्या सुरुवातीला मिळालेल्या माहितीनुसार, नवीन चौपदरी महामार्गासाठी एकूण ६००० कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत, तर दुरुस्तीच्या कामासाठी तब्बल १९२ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. हा खर्च रस्त्याच्या सध्याच्या स्थितीच्या अगदी विरुद्ध आहे. त्यामुळे प्रकल्पाच्या व्यवस्थापनाची आणि देखरेखीची तपासणी करण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट होत आहे.**

## १० वर्षात कोट्यवधींचा खर्च

**मुंबई-गोवा महामार्गाच्या कामासाठी गेल्या १० वर्षात ६००० कोटी खर्च करण्यात आले असल्याची माहिती याआधी माहिती अधिकारातून समोर आली होती. मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्पावरील खर्चाची महत्त्वाची महिती माहितीच्या अधिकारातून उघड झाली आहे. आरटीआय कार्यकर्ते जितेंद्र घाडगे यांनी यासंबंधी मिळवलेल्या माहितीनुसार, मुंबई-गोवा महामार्गावर १० वर्षात ६००० कोटी खर्च करण्यात आले आहेत.**

# माथेरान येथे रस्त्यावर पडलेले झाड पालिकेने तत्काळ हटवले

। नेरळ । वार्ताहर ।

माथेरान शहरात पहाटे पावसामुळे दस्तुरी ते अमन लॉज स्टेशन परिसरात एक मोठे झाड रस्त्यावर कोसळले होते. मात्र पर्यटकांची गर्दी असल्याने तैनात असलेले पालिका बांधकाम सफाई कर्मचारी यांनी तत्काळ ते झाड रस्त्याच्या बाजूला काढले.

माथेरान शहरात असलेली गर्द वनराई मुळे पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर झाडे कोसळण्याच्या घटना घडत असतात. त्यात पहाटे दस्तुरी ते अमन लॉज या महात्मा गांधी रस्त्यावर मोठे झाड कोसळले. त्या झाडांच्या फांद्या एवढ्या मोठ्या होत्या की त्या झाडाच्या फांद्यांना संपूर्ण रस्ता झाकून गेला होता. सलग सुट्ट्या यांच्यामुळे सकाळपासून माथेरानला पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी आहे. त्यामुळे रस्त्यावर कोसळलेले झाड यामुळे पर्यटकांना येण्या-जाण्यात अडथळे येत असल्याची माहिती मिळाली.

दरम्यान, तत्काळ कर्मचाऱ्यांनी काही वेळातच रस्त्यावर कोसळलेले झाड बाजूला केले. महात्मा गांधी रस्ता पुन्हा पूर्ववत झाला. पालिकेने दाखवलेल्या तत्परतेबद्दल व्यवसायिकांनी समाधान व्यक्त केले आहे.



# अपूर्ण मोरीचे काम पूर्ण करा : संदीप चिरायु

। कोर्लई । वार्ताहर ।



पावसाळ्यात रस्त्यावर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याचे घडणारे प्रकार लक्षात घेऊन मुरुड तालुक्यातील बोर्ली नाक्यावरील नालेसफाईची कामे पूर्ण करण्यात येऊन नवीन बांधलेल्या दोन मोऱ्या सुरू करण्यात याव्यात तसेच अपुर्ण मोरीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी संदीप चिरायु यांनी केली आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी बोर्ली ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांना दिले.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, दुकाना समोरच नवीन नाल्याचे काम मागच्या सहा महिन्यांपासून सुरू आहे. पावसाळा सुरू झाला तरी अजून ते काम पूर्ण झालेले नाही. त्या नाल्याचे पाणी समुद्राच्या खाडीमध्ये सोडण्यासाठी नवीन दोन मोऱ्या बांधण्यात आल्या होत्या, पण काही कारणास्तव त्या बंद केल्या आहेत. तातडीने दोन्ही माऱ्या सुरु कराव्यात. व्यापाऱ्यांवर पुराचे मोठे संकट निर्माण होईल व होणाऱ्या नुकसानीस आपल्याला जबाबदार धरण्यात येईल. कार्यालयावर मोर्चा काढू, असा इशारा देखील निवेदनाद्वारे दिला आहे.

# श्रीफळ वाढवून शाळेचा श्रीगणेशा

**श्रीवर्धन :** माणगाव तालुक्यातील विघवली हायस्कूल उन्हाळी सुट्टीनंतर सुरु झाली आहे. शाळेशेजारीच असणारे श्रद्धास्थान श्री काळभैरवांना मुख्याध्यापक उभारे यांच्या हस्ते श्रीफळ वाढविण्यात आले.

नवीन शैक्षणिक वर्ष सर्वार्थाने सुखसमृद्धीचे व शैक्षणिक विकासाचे जावो अशी मनोमन प्रार्थना संस्थाचालक, शिक्षक व सेवक वर्गाने केली. श्रीफळ वाढविण्याची ही परंपरा स्व.सुभाष धों. उभारे यांनी सुरु केली. त्यांचीच जमीन त्यांचे वडील बंधूंनी शाळेला विनामूल्य दिली.

दरम्यान, जेथे शेती केली जाते. त्या ठिकाणीच काळभैरवाचे श्रद्धास्थान आहे.



पावसाने दमदार सुरुवात केल्याने श्रीवर्धन, म्हसळा परिसरात शेतीच्या कामांना सुरुवात झाली आहे. समाधानकारक पाऊस बरसत असल्याने बळीराजा कामाला लागला आहे.
(छायाचित्र : अमेय नाझरे)

# अवैध मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करा

## महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीची मागणी

। उरण । वार्ताहर ।

उरण परिसरातील अनेक मच्छीमार बोटी पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत अवैध मासेमारी करीत आहेत. बंदी आदेश धाब्यावर बसवून बेकायदेशीर मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी महाराष्ट्र मच्छीमार कृती समितीच्या शिष्टमंडळाने शनिवारी मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगुंटीवार यांची भेट घेऊन केली आहे.

शासनाने राज्यातील मच्छीमारांसाठी पावसाळी हंगामात मासेमारी बंदीचे आदेश जारी केले आहेत. एक जुन ते ३१ जुलै या ६१ दिवसांचा मासेमारी बंदीचा कालावधी आहे. मात्र बंदी आदेश झुगारून उरण येथील करंजा, मोरा, रेवस, दिघोडा, केळवणे, जिते आदी गावातील शेकडो मच्छिमार पावसाळी मासेमारी बंदी कालावधीत अवैध मासेमारी करीत आहेत. यामुळे मच्छीमारांचे अतोनात नुकसान होत आहे. स्थानिक परवाना महिला अधिकारी प्रियंका भोये कारवाईचा बडगा उगारीत आहेत. परंतु वरिष्ठ पातळी वरुन त्यांना बळ देण्याची तसेच संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. तसेच अधिक कठोर कारवाई बाबत सक्षम कायदे करण्यात यावेत अशा विविध मागण्यांचे निवेदन शनिवारी महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीच्या शिष्टमंडळाने मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगुंटीवार यांची भेट घेऊन दिले आहे.

शिष्टमंडळाने दिलेल्या निवेदनावर मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगुंटीवार यांनी चर्चा केली. चर्चेअंती शासनाचे आदेश धुडकावून पावसाळी बंदी काळातही अवैधरित्या मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर कुठलीही दयामाया न दाखविता कठोर कारवाई करण्याचे आदेश मंत्र्यांनी सचिवामार्फत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले आहेत. तसेच अवैध मासेमारी करणाऱ्या नौका, मालक, तांडेल, खलाशी यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल करुन किमान तीन वर्ष शिक्षा, मोठ्या रक्कमेचा दंड, नौका जप्ती करुन संबंधीत मासेमारी परवाने रद्द करुन नौका कापून नष्ट करणे, संबंधीत मच्छीमारांची घरे जप्ती करण्याबाबत बील तयार करण्याचे आश्वासनही यावेळी मुनगुंटीवार यांनी दिले असल्याची माहिती संघटनेचे सरचिटणीस किरण कोळी यांनी दिली.

याप्रसंगी महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीच्या शिष्टमंडळाचे कार्याध्यक्ष रामकृष्ण तांडेल, सरचिटणीस किरण कोळी, खजिनदार परशुराम मेहेर, पालघर महिला संघटक ज्योती मेहेर, मरोळ बाजार मच्छीमार संघटनेच्या अध्यक्षा राजश्री भानजी, ठाणे जिल्हा मच्छीमार समाज संघाचे उपाध्यक्ष प्रमोद आरेकर, भुवनेश्वर धनु, जयेश भोईर, प्रफुल्ल तांडेल, प्रवीण तांडेल, रवींद्र पांचाळ, गौरव पाटील, प्रतिभा भाटे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

# अध्यक्षपदी मनीषा नगरकर

**महाड :** तालुक्यात कार्यरत असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्ट या सेवाभावी संस्थेचा वार्षिक पदग्रहण समारंभ शनिवारी पार पडला. या समारंभामध्ये संस्थेच्या अध्यक्षपदी मनीषा नगरकर यांची निवड करण्यात आली. मावळत्या अध्यक्षा सपना शेठ यांनी आपला अध्यक्ष पदाचा कार्यभार मनीषा नगरकर यांच्याकडे सुपूर्त करून पुढील वाटचालीला शुभेच्छा दिल्या.

रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्टचा पदग्रहण समारंभ महाडमधील हॉटेल समृद्धीच्या सभागृहांमध्ये आयोजित करण्यात आला होता. सपना शेठ यांनी मागील वर्षाचा अहवाल सादर केला. समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून रोटरीचे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर संतोष मराठे हे उपस्थित होते. खजिनदारपदी नीरज शेठ यांची निवड झाली. विक्रम जैन, संतोष नगरकर, प्रदीप शेठ, महाड विकास मंचचे परमार, रोटरी क्लब ऑफ रायगड फोर्टचे सर्व सभासद या प्रसंगी उपस्थित होते.

# आईच्या स्मृतीप्रित्यर्थ शाळांना देणगी

## गावंड परिवाराची सामाजिक बांधिलकी

। खरोशी । वार्ताहर ।



इंदुबाई रामदास गावंड यांचा मृत्यु २ जून रोजी झाला आणि गावंड परिवारातील मायेची शाल हरपली. वयाच्या ८५ व्या वर्षी निधन झाल्यामुळे त्यांच्या पश्चात ०९ मुले, ०९ सुना, २४ नातवंड, २० पतवंड, ०७ नात सुना, ७ नात जावई असा मोठा परिवार आहे.

यावेळी त्यांचे पुत्र नवनीत गावंड व साईनाथ गावंड यांनी सांगितले की, आईचा स्वभाव म्हणजे मायेची सावली, गोड व शुद्ध वाणी, संगीत प्रेमी, हसतमुख चेहरा, व्यवहार चातुर्य, योग्य निर्णय शक्ती, नऊ मुलांचा संसाराचा गाडा अगदी कष्टाने ओढत सर्व मुलांना उत्तम शिक्षण दिले. त्यामध्ये डॉक्टर, शिक्षक, प्राचार्य, ग्रामसेवक, औषध निर्माता अशी विविध क्षेत्रात सर्व मुले भूमिका बजावत आहेत.

आईला श्रद्धांजली म्हणून ४ जूनपासून १३ जूनपर्यंत दररोज हरिपाठ, स्वर्ग रोहन अध्याय आणि भजन कीर्तन यांचे आयोजन केले होते. आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिवस कार्याला वैयक्तिक वस्तूभेट न देता मंदिरे आणि ज्ञानमंदिरांना आर्थिक व वस्तुरूपी मदत देऊन समाजोपयोगी एक नवा पायंडा आमच्या गावंड परिवारामार्फत घातला गेला आहे. या आधीही वहिनीच्या स्मृतीप्रित्यर्थ अशाच प्रकारची मदत केली आहे. आईच्या स्मरणार्थ विठ्ठल रखुमाई मंदिर आवरे येथे एक लाख रुपये देणगी, संत साईबाबा प्राथमिक शाळा नवीन पनवेल येथे एक संपूर्ण साऊंड सिस्टिम व ब्लूटूथ स्पीकर, साई मंदिर आवरे या ठिकाणी एक संपूर्ण साऊंड सिस्टिम व ब्लूटूथ स्पीकर, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालय पिरकोन भागशाळा खोपटे या ठिकाणी एक संपूर्ण साऊंड सिस्टिम व ब्लूटूथ स्पीकर, भोलानाथ मंदिर आवरे या ठिकाणी एक संपूर्ण साऊंड सिस्टिम व ब्लूटूथ स्पीकर तसेच ०६ सिलिंग फॅन आईच्या आठवणीनिमित्त देण्यात आले.

सांत्वनासाठी माननीय आमदार जयंत पाटील, माजी नगराध्यक्ष माननीय जे. एम. म्हात्रे, पनवेल महानगरपालिका माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, माजी आमदार मनोहर भोईर, आमदार महेश बालदी, माजी शिक्षक आमदार बाळाराम पाटील, माजी सभापती काशिनाथ पाटील, माजी सभापती नरेश घरत, माजी जिल्हा परिषद सदस्य दिलीप परदेशी, माजी उपसभापती वैशाली पाटील, विकास घरत उपस्थित होते.

# किशोर जैन यांचे उध्दव ठाकरेंकडून कौतुक

**नागोठणे :** कोकण पदवीधर हा प्रचंड मोठा मतदार संघ आहे. निवडणूकीत अर्ज भरण्यास सांगितल्यानंतर किशोर जैन यांनी अर्ज भरला. आणि उध्व ठाकरे यांनी अर्ज मागे घेण्यास सांगितल्यावर तो मागे घेतला. जैन यांनी ठाकरे यांच्यावर असलेली निष्ठा दाकवल्याने ठाकरे यांनी देखील त्यांचे कौतुक केले आहे. किशोर जैन तुमची नोंद मी घेतली असल्याने तुम्ही हा जो काही दिलदारपणा दाखविला आहे तो मी आयुष्यभर विसरणार नाही आणि किशोर जैन तुमच्या हक्काचे असेल ते तुम्हाला दिल्याशिवाय राहणार नाही, असे उद्गार उध्दव ठाकरे यांनी काढले.

## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६**
- **अलिबाग येथे हॉस्पिटलमध्ये कामासाठी पुरूष कर्मचारी पाहिजेत. योग्य पगार दिला जाईल. डॉ.सरोज तांबोळी मेमोरिअल हॉस्पिटल-रामनाथ. डॉ.अतुल कोतेकर- ७७९८८८०७०४, प्रिया कर्णिक-९३७२२०४९७०**
- **हार्डवेअर दुकानात मांडवा येथे मुलगी कामाला पाहिजे. मो. ८००७८९३२३२, ९४२१९५४३४८**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# मिठाई दुकानदारांना नियमांचा विसर

। पनवेल । प्रतिनिधी ।

**मिठाईच्या बॉक्सवर त्याचबरोबर दुकानांमध्ये ठेवलेल्या मिठाईच्या ट्रेवर मिठाईची 'एक्सपायरी डेट' ग्राहकांना दिसेल अशा दर्शनी भागात लावण्यात यावी, असा आदेश भारत सरकारच्या फूड सेफ्टी अँड स्टँडर्ड ऑथॉरिटी ऑफ इंडियाच्यावतीने २०२० साली जारी करण्यात आला होता.**



एफएसएसआयच्या त्या आदेशाचे नंतर काही दिवस दुकानदारांनी पालन केले. आता मात्र दुकानदारांना एफएसएसआयच्या त्या निर्णयाचा दुकानदारांना विसर पडल्याचे पाहायला मिळत असून, पनवेल पालिका हद्दीतील पनवेल, नवीन पनवेल, खांदा, कळंबोली, खारघर तसेच इतर वसाहतीमधील मिठाईच्या दुकानात विक्री करिता उपलब्ध असलेल्या मिठाइवर एक्स्पायरी डेटच टाकण्यात येत नसल्याचे वास्तव पाहायला मिळत आहे. मिठाई दुकानदारांना मिठाईच्या बॉक्सवर त्याचबरोबर दुकानांमध्ये ठेवलेल्या मिठाईच्या ट्रेवर मिठाईची 'एक्सपायरी डेट' दर्शनी भागात ग्राहकांना दिसेल अशी लावण्याचे निर्देश एफएसएसआयतर्फे देण्यात आले होते. नियमाचे उल्लंघन केल्यास संबंधित मिठाई दुकानदारांवर कारवाई करण्यात येईल, असे सांगण्यात आले होते. या निर्णयामुळे सणासुदीच्या काळात ग्राहकांना चांगल्या दर्जाची मिठाई उपलब्ध होणे शक्य आहे. एफडीआय, एफएसएसआयकडुन नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर ठोस कारवाई होत नसल्याने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदारांचे फावत असल्याचे चित्र आहे.

## सण उत्सव काळात पाळले जातात नियम

**सण उत्सव काळात मिठाईला मोठी मागणी असते. या काळात एफडीआयकडून कारवाई होण्याची भीती असते. या मुळे कारवाईच्या भीतीने मिठाई दुकानदार सन उत्सव काळात नियमांचे पालन करताना दिसतात. मात्र इतर दिवसात मिठाईला हवी तितकी मागणी नसल्याने बनवलेली मिठाई जास्तीत जास्त दिवस विकता यावी या करता दुकानदार नियमाना बगल देताना दिसून येतात.**



# आकर्षक छत्र्या, रेनकोट उरण बाजारात दाखल

। उरण । प्रतिनिधी ।

पावसाळा सुरू होताच उरण बाजारात शालेय साहित्यासह विविध रंगीबेरंगी छत्र्या, रेनकोट या पावसाळी वस्तूंनी बाजारपेठेतील दुकाने गजबजली असून याच्या खरेदीसाठी लगबग सुरू झाली आहे.

लहान मुलांच्या रेनकोटमध्ये कार्टूनची प्रिंट असलेल्या रेनकोटला मागणी अधिक आहे. मुलींमध्ये वनपीस, टूपीस आणि पोन्चोलाही मागणी आहे. खरेदीदारांमध्ये ब्रॅण्डेड रेनकोटला सर्वाधिक मागणी आहे. दरानुसार दर्जा असल्याने मध्यम आणि किमान एक पावसाळी हंगाम जाईल, असा रेनकोट खरेदी करण्याकडे लोकांचा अधिक कल आहे.

पावसाळी सँडल, बुट्स, चप्पला देखील खरेदी केल्या जात आहेत. नियमित एक घडी असणाऱ्या काळ्या रंगाचे कापड असलेल्या छत्र्यांसोबत आता छत्रीवर पाणी पडताच त्यावरील प्रिंट केलेली पाना-फुलांसह कार्टून चित्रांचा रंग बदलणाऱ्या छत्र्यांना मागणी आहे.

# शाळेची पहिली घंटा वाजली

## विद्यार्थ्यांना दिला नवीन गणवेश, दप्तर अन पुस्तके

**। पाली/गोमाशी (वार्ताहर) ।**

उन्हाळी सुट्ट्या संपल्यावर जिल्ह्यातील सर्व शाळा शनिवारी (ता.१५) सुरु झाल्या. शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य, उत्साह आणि आनंद संचारला होता. शाळेमध्ये नवागतांचे जोरदार स्वागत झाले. प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.



शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य व पालकांसह विद्यार्थी, शिक्षकांनी सकाळी प्रभात फेरी आणि दिंडी काढली होती. मुलांना पाठ्यपुस्तकांचे वाटप केले गेले.

शाळेच्या पहिल्याच दिवशी पहिलीत दाखल मुलांचे गावातून वाजत गाजत, लेझीमच्या तालावर मिरवणूक काढून शाळा पूर्वतयारी मेळावा क्र.२ ने फुगे, कागदी टोप्या, वर्ग सजावट याने शाळा प्रवेशोत्सव व शाळापूर्व तयारी मेळावा क्र.२ यशस्वी मेळाव्याचे आयोजन करून नवागत स्वागत मोठ्या उत्साहात करण्यात आले. प्रवेशोत्सव व पाठ्यपुस्तक दिन साजरा करण्यात आला, असे नेणवली शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र अंबिके यांनी सांगितले. काही ठिकाणी विद्यार्थ्यांच्या घरी जावून खाजगी गाड्यांमधून विद्यार्थ्यांना शाळेत आणण्यात आले. पोषण आहारात गोड पदार्थ देण्यात आले.

सुधागड तालुका गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे व केंद्रप्रमुख कल्पना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व सूचनेनुसार यावर्षी नवीन वर्षाची सुरुवात ही प्रवेशोत्सवाने करण्याबाबत नियोजन करण्यात आले. शाळापूर्व मेळाव्या नंतर दाखलपात्र विद्यार्थी व शाळेतील ७ वी पर्यंत सर्व विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरण पाहुण्यांच्या हस्ते करण्यात आले.

> नवीन शैक्षणिक धोरण अंतर्गत निपुण भारत पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान याची यशस्वी अंमलबजावणी साठी हा शाळाप्रवेशोत्सव नक्कीच उपयुक्त ठरेल.
> – राजेंद्र अंबिके, मुख्याध्यापक, रजिप शाळा नेणवली

> शाळेच्या पहिल्या दिवशी खुप मज्जा आली. नवीन मित्रांची ओळख झाली. वर्षभर खेळ व मौजमजेबरोबरच अभ्यासही जोरात करणार आहे. नवीन दफ्तर, गणवेश, पुस्तके सर्व काही नविन आहे त्यामुळे खुप आनंद झाला आहे.
> – यज्ञा सुर्वे, विद्यार्थीनी

# चोरढे शाळेत नवागतांचा मेळावा

**। मुरूड । वार्ताहर ।**

हर्ष हा साकारला मनी, आनंदाच्या या क्षणी, नवागतांचे करी स्वागत, सर्व पालक वृंद हे हसत खेळत, अशा आनंदाच्या क्षणांनी मुरुड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा चोरढे मराठी येथे नवागतांचा मेळावा साकारण्यात आला.



मेळाव्याची सुरुवात ग्रामपंचायत कार्यालय चोरढे येथून करण्यात आली. नवीन दाखल पात्र सर्व ११ विद्यार्थी उपस्थित होते. तसेच एक विद्यार्थी जादा दाखल झाला. दाखल पात्र सर्व विद्यार्थ्यांची दोन घोडा गाडीतून मिरवणूक काढण्यात आली. लेझीम पथकात सर्व विद्यार्थी सामील झाले होते. काही विद्यार्थी लाठीकाठीचे प्रात्यक्षिक करत होते. खालुबाजा व इतर वाद्य वृंदाच्या सहाय्याने पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाद्यवृंदाच्या ठेक्यावर विद्यार्थ्यांसमवेत पालक सुद्धा नाचत होते. विद्यार्थ्यांनी फटाके वाजवून नवागतांचे स्वागत केले.

शाळेच्या प्रांगणात आल्यानंतर सविता वाडकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यानंतर पालक सभा घेण्यात आली. पालक सभेला सर्व पालक उपस्थित होते. शाळा प्रवेशाचा पहिला मेळावा घेण्यात आला. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक वाटप करण्यात आले. पहिला दिवस म्हणून मुलांना गोड खाऊ म्हणून खिरीचे वाटप करण्यात आले. पालकांतर्फे मंगळवारी परसबाग तयार करण्याचे ठरवण्यात आले. यावेळी चेतन पाटील, सरपंच तृप्ती घाग, सुरेश ताबडे, सुनील घाग, अनिल चोरढेकर आदी मान्यवर उपस्थित होते.



### माऊंट कार्मेल हायस्कूल येथे

# शालेय विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप

**। मुरुड । वार्ताहर ।**

शाळेच्या पहिल्याच दिवशी मुरुड तालुक्यातील माऊंट कार्मेल हायस्कूल येथील इयत्ता पहिली ते आठवीच्या शालेय विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले.

सर्वप्रथम नव्यानेच या शाळेत प्रवेश घेतलेल्या शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत या शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर ज्युली चांदी यांच्या हस्ते प्रत्येक विद्यार्थ्यास गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी इयत्ता दहावीच्या शालेय विद्यार्थ्यंसाठी विशेष मार्गदर्शन या शाळेचे व्यवस्थापक फादर बोनाव्हेंचर यांनी केले.

यावेळी त्यांनी सांगितले की, दहावी हा विशेष टप्पा असून विद्यार्थ्यांनी वेळच्या वेळेवर दिलेला होम वर्क तसेच पाठांतर केल्यास निश्चितच चांगले गुण मिळतील असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला. सदरील कार्यक्रमासाठी रोशन मार्टिस, सुरेश वेगस, राजेंद्र घोसाळकर, शोधन बळकवडे, अक्षता म्हात्रे, शुभांगी पंची, वित्रीण वेगस, शिक्षकेत्तर कर्मचारी अल्बर्ट मार्टिस, हेंरी वेगस, लुसीअन गोम्स आदी उपस्थित होते.

# कर्जत तालुक्यात विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत

## मिरचोली शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप; शेलूमध्ये बैलगाडीमधून मिरवणूक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात रायगड जिल्हा परिषद शाळांमध्ये आजचा पहिला दिवस विद्यार्थ्यांचे स्वागत करून साजरा झाला. शेलू शाळेतील विद्यार्थ्यांची चक्क बैलगाडीमधून मिरवणूक काढण्यात आली.

या शैक्षणिक वर्षाची सुरुवातीला पहिला दिवस विद्यार्थ्यांचे स्वागत करून साजरा करण्याचे शिक्षण विभागाने आदेश दिले होते. त्यानुसार कर्जत तालुक्यातील सर्व २४० जिल्हा परिषद शाळांमध्ये पहिला दिवस विद्यार्थ्यांचे वेगवेगळ्या पद्धतीने स्वागत करून साजरा करण्यात आला. शनिवार असल्याने विद्यार्थ्यांची सकाळची शाळा होती आणि त्यासाठी सकाळ पासून विद्यार्थ्यांनी शाळांचे रस्ते गजबजून गेले होते. रेल्वे स्टेशन असलेल्या शेलू गावातील जिल्हा परिषद येणाऱ्या विद्यार्थ्यांना काही पालकांनी बैलगाडीमध्ये बसवून आणले. शाळेनेदेखील फुग्यांनी सजवलेली बैलगाडीमध्ये बसवून गावाची सैर मारून शाळेत आणण्यात आले.



मुख्याध्यापक अनंत खैरे आणि अन्य शिक्षक वर्गाने तसेच शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांनी नव विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

रायगड जिल्हा परिषद शाळा मिर्चोली येथे श्रीसाई ट्रस्ट नवी मुंबई यांचे माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण केले. सर्व प्रकारचे शैक्षणिक साहित्य शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सुरु होत असतानाच उपलब्ध करून दिले.कर्जत तालुक्यातील दुर्गम आणि आदिवासी भागातील समस्या सोडविण्यासाठी श्रीसाई ट्रस्ट गेली सहा ते सात वर्षापासून काम करत आहे.यावेळी साई ट्रस्टचे गणेश अय्यर, रिध्दि गाला, राधिका घुले यांची प्रमुख उपस्थिती होती. तेथे शाळेचे मुख्याध्यापक सुदर्शन बिडवे तसेच शिक्षिका बिडवे आणि दिलीप घुले आदी उपस्थित होते.

# तळेगांव शाळेत प्रवेशोत्सव

**। तळा । वार्ताहर ।**

प्राथमिक मराठी शाळा तळेगांव तर्फे तळा येथे नवागत विद्यार्थांचा प्रवेशोत्सव समारंभ पार पडला. यावेळी पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका स्मृती शिंदे विषय शिक्षक विजय येलवे, उपशिक्षक दिनेश निकम, रेखा अकोलकर, सरपंच विनीता चाळके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष किशोर कदम, उपाध्यक्ष निता तळेगांवकर यांनी स्वागत केले.यावेळी ग्रामपंचायत तळेगांव यांनी शाळेला टीव्ही संच भेट दिला. प्रथम पहिली इयत्ता व इतर इयत्तामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे व पालकांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापिका यांचे अधिपत्याखाली शिक्षक समिती जिल्हाध्यक्ष विजय येलवे म्हणाले की, प्राथमिक शाळेचा दर्जा सुधारला आहे. शासनाने उच्च पदवी प्राप्त शिक्षक वर्ग तसेच पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश दिला जात आहे.चांगल्या पध्दतीचे प्राथमिक शिक्षण दिले जात आहे. ती पहिली पायरी आहे आज शिक्षण मातृभाषेतून घेतले पाहिजे. खाजगी शाळाचा खर्च पालकांना परवडत नसल्याने प्राथमिक शाळेकडे पालकांचा कल वाढत आहे. आज सर्व शाळेतील पटसंख्या वाढत असलेली पाहून आनंद वाटतो पालकांनी आपला पाल्य शाळेतून घरी आल्यावर वर्गात काय शिकवले गेले त्याची मुलांकडून माहिती घेतली पाहिजे. हे पालकांचे काम आहे, असे विजय येलवे म्हणाले.



# विद्यार्थ्यांचे केले औक्षण

**। मुरूड । वार्ताहर ।**

मुरूड-यशवंतनगरच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंतच्या वर्गात प्रवेश घेतलेल्या सुमारे १२५ विद्यार्थ्याचे शाळेच्या सर्व शिक्षिकांनी औक्षण करून व शाळेतील शिक्षकांनी गुलाबपुष्प देऊन शाळेच्या पहिल्या दिवशी स्वागत केले.

या कार्यक्रमामुळे शाळेतील वातावरण भारावून गेले होते. प्रवेशपात्र विद्यार्थीही या स्वागताचे आनंदी व अंतर्मुख झालेले दिसून आले. राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने नूतन प्रवेशपात्र विद्यार्थ्यांचे शाळेच्या पहिल्या दिवशी आपापल्या परीने यथोचित स्वागत करण्याचे आदेश प्रत्येक शाळेला दिले होते.

शनिवार असल्याने शाळा सकाळी भरविण्यात आली होती तरी देखील शाळेत आलेल्या नवीन विद्यार्थी व त्यांना घेऊन आलेल्या पालकांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. विशेषत: ग्रामीण भागातील प्राथमिक शाळांतून मोठ्या शाळेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

# शाळेतलं पहिलं पाऊल, उज्ज्वल देश घडवेल

## गट शिक्षण अधिकारी सुनील गवळी यांचे प्रतिपादन

**। मुरूड । वार्ताहर ।**

राज्यभरातील शाळा दीर्घ सुट्टीनंतर सुरू होत आहेत. शाळेत पहिल्यांदाच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन तालुक्यात सर्वत्र केले जात आहे. शाळा ही विद्यार्थ्यांच्या व्यक्तीमत्वाला पर्यायाने देशाला आकार देते. विद्यार्थी उद्याचे भविष्य आहे. त्यांना शिकण्यासाठी शासनातर्फे आपण मोफत पाठ्यपुस्तक, गणवेश व शूज तसेच अन्य योजना कार्यान्वित करत आहोत. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस पूरक उपक्रमाचे आयोजन केल्यास विद्यार्थ्यांचं आजचं शाळेतलं पहिलं पाऊल, प्रगत देश घडवेल, असे प्रतिपादन मुरूड तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी सुनिल गवळी यांनी शाळाभेटी दरम्यान केले.



गट शिक्षण अधिकारी गवळी यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या मजगाव शाळेस भेट दिली होती. यावेळी ते बोलत होते.

यावेळी गटशिक्षण अधिकारी गवळी यांनी विविध स्पर्धा परीक्षेत उत्तम काम गिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देवून सत्कारही केला. तसेच शिक्षकांच्या पाठीवरती कौतुकाची थाप देवून नव्या शैक्षणिक वर्षातील कामकाजासाठी शुभेच्छा दिल्या.

शाळेचे मुख्याध्यापक हेमकांत गोयजी, मनिषा वाघरे, प्रमिला फुंदे, चेतन चव्हाण, हर्षा नांदगावकर, रंजिता केमकर व साधनव्यक्ती महेश भगत, चेतन पाटील, पुकळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

# माणगाव आश्रमशाळेत प्रवेशोत्सव उत्साहात

**। माणगाव । वार्ताहर ।**

शासनाच्या धोरणानुसार मोठ्या उत्साहाने प्रवेशोत्सव सर्व शाळांमध्ये साजरा करण्यात आला. माणगाव येथील वनवासी कल्याण आश्रमशाळा उत्तेखोल आश्रम शाळेत नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागताची जय्यत तयारी शनिवारी (दि.१५) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आली होती.



शालेय दर्शनी भागात रांगोळी, फुले आदींची सजावट करुन वर्गखोल्यांना फुगे व पताकांची सजावट करण्यात येऊन सर्व विद्यार्थ्यांसाठी सेल्फी पॉईंट उभे करण्यात आले होते. ढोल ताश्यांच्या गजरात व औक्षण करून गुलाब पुष्प देऊन नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत मोठ्या उत्साहाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

हा स्वागतोत्सव समारोह कार्यक्रम आश्रम शाळेचे शालेय समिती अध्यक्ष महादेव सखाराम जाधव, वनवासी कल्याण आश्रम संकुल समिती सहसचिव नितीन चांदोरकर, शालेय समिती सदस्य लक्ष्मण जंगम, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी पेणचे प्रतिनिधी सूर्यवंशी, शाळेचे मुख्याध्यापक अरुण पाटील, उत्तम पाटील, पालक वर्ग, अधीक्षक, अधीक्षिका शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे उपस्थितीत मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.

# मजगाव प्राथमिक शाळेत प्रवेशोत्सव

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुरूड तालुक्यातील आदर्श शाळा म्हणून लौकिक मिळवलेल्या मजगाव येथील रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे नव्या शैक्षणिक वर्षात स्वागत करण्यासाठी आयोजित करण्यात आलेला शाळा प्रवेशोत्सव उत्साहात पार पडला.



शाळेत पहिल्यांदाच नव्याने पाऊल ठेवणाऱ्या बालकांच्या मनातली भीती दूर व्हावी, त्यांनी शाळेत रूळावे व आनंदाने शैक्षणिक कृती कराव्यात.यासाठी हा शाळा प्रवेशोत्सव कार्यक्रम राबवला जात असल्याचे मुख्याध्यापक हेमंत गोयजी यांनी सांगितले.

या प्रवेशोत्सवात मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना यंदा शासनातर्फे पाठ्यपुस्तके गणवेश याचे वितरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे नियोजन मुख्याध्यापक हेमकांत गोयजी यांनी उत्तम प्रकारे केले होते.

यावेळी मनीषा वाघरे, हर्षा नांदगावकर, प्रमिला फुंदे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखिल मानाजी उपाध्यक्ष उमेश कोंडाजी, माजी उपसरपंच योगेंद्र गोयजी तसेच रूपेश अंबाजी, रूपेश पाके आदी सदस्य उपस्थित होते.

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येते की, खालील वर्णनाची जमीन मिळकत ही या मिळकतीचे विद्यमान मालक काशीनाथ राघव पेढवी, एकनाथ राघव पेढवी, जनाबाई हासुजी पाटील, शारदा मोरेश्वर गजने, जयश्री विश्वनाथ वाघमारे सर्व रा. आगरसुरे, ता. अलिबाग, जि.रायगड, यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचा माझे अशिलांचा मानस आहे. याकरिता सदर मिळकत विकत घेणेबाबत माझे अशिलांनी या मिळकतीचे विद्यमान मालकांशी तशी बोलणी केली आहेत. या मिळकतीबाबत मालकीहक्काचा शोध घेण्याचे काम मजकडे सोपविण्यात आले आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | ग.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|---|
| आगरसुरे, ता. अलिबाग | २१८ | ४ | ०-७३-५०<br>०-१९-८०<br>०-९३-३० | ८-४६ |

या मिळकतीपैकी पश्चिम दिशेकडील ०-५३-० गुंठे क्षेत्राची मिळकत.

सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व बोजारहित असून या मिळकतीमधील आपले मालकी हक्क अबाधित आहे, तसेच सदर मिळकत ही आपले प्रत्यक्ष ताबे, कब्जा, वहिवाटीत आहे असा निर्वाळा मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

सबब, या मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा, अथवा गहाण, दान, लिज, लिन, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, कर्ज वगैरे बाबत कसलाही हक्क अथवा हरकत असल्यास अथवा काशिनाथ राघव पेढवी, एकनाथ राघव पेढवी, जनाबाई हासुजी पाटील, शारदा मोरेश्वर गजने, जयश्री विश्वनाथ वाघमारे यांचे सोबत माझे अशिल करत असलेल्या व्यवहारांस कोणाची काही हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्यासंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार खरेदीदारांचे वकील यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत आणुन द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व विद्यमान मालकांना या मिळकती बाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर मागाहुन येणारी कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत विचारात घेतली जाणार नाही व या प्रकारे मागाहून आलेली अशी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक देखील राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वांस कळविले.

अलिबाग
दिनांक : १६/०६/२०२४

Cjayant Law Office
**ॲड. जयंत हरेश्वर चेऊलकर**
२०१, सृष्टी, २ रा मजला
वेधशाळेसमोर, अलिबाग, रायगड

### शिक्षक पाहिजेत

आ.सा.धो.र.हि. मंडळाच्या बाबासाहेब नाजरे हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज,आवास या अनुदानित माध्यमिक विद्यालयात संस्था स्तरावर खालील शिक्षक पदाची आवश्यकता आहे.

B.A./M.A. (मराठी/इंग्रजी)- B.P.Ed-१ पद

पात्र उमेदवारांनी अर्ज आणि शैक्षणिक पात्रतेच्या मूळ कागदपत्रासह स्वखर्चाने मंगळवार दि.१८/०६/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मुलाखतीसाठी विद्यालयात हजर रहावे.

**अध्यक्ष/सचिव**
आ.सा.धो.र.हि. मंडळ आवास,
अलिबाग, रायगड.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की मी समीर रामचंद्र म्हात्रे, रा.मु.पो. डोलवी, ता.पेण, जि.रायगड यांनी मौजे जुई अब्बास, ता.पेण, जि.रायगड १. मोरेश्वर गंगाराम सुर्वे, २. अंजनी राजाराम चेवले, ३. सुनील सुरेश सुर्वे यांच्या मालकीची मिळकत कायमस्वरुपी मी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे.

| गाव | मालक | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| जुई अब्बास | मोरेश्वर गंगाराम सुर्वे<br>अंजनी राजाराम चेवले<br>सुनील सुरेश सुर्वे | ९१ | ०-२९-३० | २-३१ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वत: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेल व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १७/०६/२०२४

**समीर रामचंद्र म्हात्रे,**
रा.मु.पो. डोलवी, ता.पेण, जि.रायगड

# भारताचा द.अफ्रिकेवर दणदणीत विजय

## ■ केला १४३ धावांनी पराभव; स्मृती मानधनाची शतकी खेळी

। बंगळुरू । वृत्तसंस्था ।
दक्षिण आफ्रिका महिला क्रिकेट संघ सध्या भारत दौऱ्यावर आहे. भारतीय महिला आणि द. आफ्रिका महिला संघात रविवारपासून (दि.१६) ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू झाली आहे. या मालिकेच्या पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने १४३ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारताने १-० ने आघाडी घेतली आहे. या सामन्यात भारताच्या विजयात स्मृती मानधना आणि आशा शोभनाने मोलाचा वाटा उचलला आहे. यात स्मृतीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७ हजार धावांचा टप्पा पूर्ण केला असून एकदिवसीय ६व्या शतकाची देखील नोंद केली आहे.





हरमनप्रीत कौरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. स्मृती मंधानाने १२७ बॉलमध्ये ११७ धावा केल्या. तिने १२ चौकार आणि १ षटकार लगावला. रिचा घोषचा बळी गेल्यावर भारतीय संघाची धाव संख्या ५ बाद ९९ अशी होती. यावेळी दीप्ती आणि स्मृती सहाव्या विकेटसाठी ८१ धावांची भागीदारी केली. त्यानंतर दीप्ती शर्मा ४८ बॉलमध्ये ३७ धावावंर बाद झाली. त्यामुळे भारतीस संघाची स्थिती ६ बाद १८० अशी झाली होती. त्यानंतर स्मृती मंधानाने भारतीय संघाचा डाव सावरला. त्यामुळे भारतीय संघाने ५० षटकांमध्ये ८ बाद २६५ धावा केल्या. तसेच, आशा शोभनाने नऊ षटकांत २१ धावा देत ४ बळी घेतले. आणि अफ्रिकेच्या संघाला सर्वबाद १२२ धावांवर रोखले.

### ७ हजार धावांचा टप्पा

भारताची स्टार फलंदाज स्मृती मानधनाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७ हजार धावांचा टप्पा पूर्ण केला आहे. याआधी भारताची माजी दिग्गज खेळाडू मिताली राजने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७ हजार धावा करण्याचा विक्रम नोंदवत पहिली भारतीय महिला क्रिकेटर बनली होती. त्यानंतर स्मृती मानधनाने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७ हजार धावांचा टप्पा पूर्ण करणारी दुसरी भारतीय महिला ठरली आहे.

# एमपीएलतर्फे फॅन-पार्कचे आयोजन



। मुंबई । क्रीडा प्रतिनिधी ।
महाराष्ट्र क्रिकेट असो.ने आयोजित केलेल्या एमपीएल क्रिकेट स्पर्धा सध्या पुणे येथील गहुंजे क्रिकेट स्टेडियमवर दिमाखदार पणे सुरू आहेत. आयपीएल नंतर लगेचच महाराष्ट्र क्रिकेट असो.ने गतवर्षी पासून एमपीएल टी-२० क्रिकेट स्पर्धा आयोजित केली जात आहे.

यावर्षी पासून राज्यात विविध ठिकाणच्या मैदानावर फॅन-पार्क इव्हेंट आयोजित करून स्पर्धेची जाहिरात संपूर्ण महाराष्टातील कानाकोपऱ्यात पोचवली जात आहे. फॅन-पार्क इव्हेंटमध्ये मोठ्या डिजिटल पडद्यावर लाईव्ह मॅचचे प्रेक्षपण केले जाते. चितळे एक्सप्रेस पुरस्कृत असलेल्या फॅन-पार्कला प्रेक्षक मोठी गर्दी करून सामन्याचा आनंद घेत आहेत. शनिवारी अश्याच फॅन-पार्कचे आयोजन खारघर येथील गोखले हायस्कूलच्या मैदानावर करण्यात आले होते. यावेळी रायगड रॉयल्स विरुद्ध पुणेरी बाप्पा या संघाचा सामना लाईव्ह दाखवण्यात आला होता.

# निकोलस डेव्हलिन ‘रिटायर्ड आऊट’

। अँटिग्वा । वृत्तसंस्था ।
टी-२० विश्वचषकात शनिवारी (दि.१५) रात्री इंग्लंड आणि नामिबिया यांच्यात सामना खेळला गेला. पावसामुळे हा सामना १०-१० षटकांचा झाला आणि यामध्ये इंग्लंडने ४१ धावांनी विजय मिळवला. या सामन्यात इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना १० षटकांत ५ गडी गमावून १२२ धावा केल्या. प्रत्युत्तरात नामिबियाचा संघ तीन गडी गमावून केवळ ८४ धावा करू शकला. अशाप्रकारे डकवर्थ लुईस नियमानुसार इंग्लंडने हा सामना ४१ धावांनी जिंकला. या सामन्यात नामिबियाचा स्टार फलंदाज निकोलस डेव्हलिन रिटायर्ड आऊट झाला. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात पहिल्यांदाच एखादा फलंदाज अशा प्रकारे बाद झाला आहे.

१० षटकांत १२३ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना मायकल लिंगेनने नामिबियाला चांगली सुरुवात करून दिली. त्याचवेळी दुसऱ्या टोकाला असलेला निकोलस डेव्हलिन त्याच्या शैलीत फलंदाजी करत नव्हता. सहाव्या षटकात डेव्हिन १६ चेंडूत १८ धावा काढून खेळत होता. यामुळे त्यांनी ‘रिटायर्ड आऊट’ होण्याचा निर्णय घेतला. यानंतर त्याच्या जागी डेव्हिड विस क्रीझवर आला. यामुळे टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात पहिल्यांदाच एखादा खेळाडू ‘रिटायर्ड आऊट‘ होण्याची वेळ आली आहे.



## डेव्हिड व्हिसाची निवृत्ती

। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।
इंग्लंडविरुद्धच्या झालेल्या सामन्यात नामिबियाच्या संघाला ४१ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. यासोबत टी-२० विश्वचषकामधील नामिबियाचा प्रवास संपला आहे. संघाने आतापर्यंत चार सामने खेळले असून केवळ एकच सामना जिंकला आहे. याच कारणामुळे नामिबियाचा संघ सुपर-८ मध्ये पोहोचू शकला नाही. दरम्यान, नामिबियाचा स्टार खेळाडू डेव्हिड व्हिसा याने निवृत्ती जाहीर केली आहे. इंग्लंडविरुद्धचा सामना हा त्याचा शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना होता.

# पाकिस्तानी खेळाडूंची होणार झाडाझडती

। लाहोर । वृत्तसंस्था ।
आठ महिन्यांपूर्वी झालेल्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धे नंतर आता टी-२० विश्वचषक स्पर्धेत साखळीतच गाशा गुंडाळावा लागलेल्या पाकिस्तानी खेळाडूंची त्यांच्या क्रिकेट मंडळाकडून झाडाझडती होणार आहे. त्यांना देण्यात येणाऱ्या मानधनात कपात करण्याचे संकेत पाक मंडळाने दिले आहेत.

पावसामुळे त्यांची संधी हुकली असली तरी स्पर्धेत अगोदर अमेरिका आणि नंतर भारताकडून झालेल्या पराभवामुळे त्यांचा पाय खोलात गेला होता. जवळपास सर्वच खेळाडूंकडून झालेल्या सुमार खेळामुळे त्यांच्या सर्वच माजी खेळाडूंनी टीकेचे आसूड ओढलेले आहेत. आता तर पाकिस्तान क्रिकेट मंडळाने खेळाडूंच्या नाड्या आवळण्याचे संकेत दिले आहेत.



पाक मंडळाचे अगोदरचे अध्यक्ष झाका अश्रफ यांच्या कार्यकाळात खेळाडूंबरोबर करण्यात आलेले करार रद्द करावे, असा सल्ला काही विद्यमान अध्यक्ष मोहसिन नक्वी यांना दिला आहे. मुळात सर्व करारांचा फेर आढावा घेण्यात येणार आहेत आणि तसे झाल्यास खेळाडूंना मिळणाऱ्या मानधनात कपात होऊ शकेल. तसेच, पीसीबीला मिळणाऱ्या उत्पन्नातून खेळाडूंना ठराविक रक्कमही देण्याचाही करार झाला होता. आता यात कपात होणार हे जवळपास निश्‍चित आहे.

# ऑस्ट्रेलिया साहेबांवर मेहरबान

## स्कॉटलंडची कांगारूंना कडवी झुंझ

। सेंट लुसिया । वृत्तसंस्था ।
टी-२० विश्वचषकाच्या ३५व्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने स्कॉटलंडचा पाच गडी राखून पराभव केला. ऑस्ट्रेलियाच्या या विजयासह इंग्लंडचा संघ सुपर-८ मध्ये पोहोचला आहे. दुसरीकडे, स्कॉटलंडचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

प्रथम फलंदाजी करताना स्कॉटलंड संघाची सुरुवात खुपच खराब झाली. ३ धावांच्या स्कोअरवर त्यांना पहिला धक्का बसला. मायकेल जोन्स केवळ २ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर जॉर्जने २३ चेंडूत ३५ धावा केल्या आणि ब्रँडनने ३४ चेंडूत ६० धावांची तुफानी खेळी केली. स्कॉटलंडसाठी टी-२० विश्वचषकामध्ये सर्वात वेगवान अर्धशतक करण्याचा विक्रमही मॅकमुलेनच्या नावावर आहे. त्याने अवघ्या २६ चेंडूत अर्धशतक झळकावले. यानंतर बेरिंग्टनने ३१ चेंडूत नाबाद ४२ धावा करत स्कॉटलंडला मोठ्या धावसंख्येपर्यंत नेले.

लक्ष्याचा पाठलाग करत उतरलेल्या ऑस्ट्रेलिया संघाला लवकरच पहिला धक्का बसला. वॉर्नर १ धाव करून पॅव्हेलियनमध्ये परतला. मिचेललाही केवळ ८ धावा करता आल्या. मॅक्सवेललाही ११ धावा करता आल्या आणि ६० धावांपर्यंत कांगारू संघाने ३ गडी गमावले होते. मात्र, यानंतर हेड आणि स्टॉइनिस यांनी झंझावाती भागीदारी करत ऑस्ट्रेलियाला सामन्यात पुनरागमन केले. हेडने ४९ चेंडूंत ६८ धावांची खेळी केली. तर, स्टॉइनिसने २९ चेंडूंत ५९ धावांची खेळी केली. यानंतर डेव्हिड आणि वेडने संघाला विजयापर्यंत नेले. ऑस्ट्रेलियाच्या या विजयामुळे स्कॉटलंड टी-२० विश्वचषकामधून बाहेर पडला असून इंग्लंड सुपर-८साठी पात्र ठरला आहे.

## रोहित, गिलच्या वादाला पूर्णविराम

**मुंबई :** भारतीय संघाचा युवा खेळाडू सलामीवीर शुभमन गिल याने रोहित शर्माला अनफॉलो केल्याच्या चर्चा समोर आल्या होत्या. या चर्चा वाढण्यापूर्वीच गिलने या वादावर पडदा टाकला आहे. रोहितसोबतचा फोटो इन्स्टाग्राम स्टोरीवर ठेवून गिलने वादाला पूर्णविराम दिला आहे. यात गिलने मी शिस्तीचं पालन कसे करायचे याचे धडे रोहित शर्माकडून घेतल्याचे म्हटले आहे.

# सुपर-आठ संघ जवळपास स्पष्ट

। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।
टी-२० विश्वचषकाच्या सुपर-८ मध्ये कोण कोणता संघ जाणार हे जवळपास स्पष्ट झाले आहे. यावेळी विश्वचषकामध्ये एकूण २० संघांनी भाग घेतला होता. यापैकी फक्त आठ संघच पुढच्या फेरीत म्हणजेच सुपर-८ मध्ये प्रवेश करणार आहेत. आतापर्यंत पुढील टप्प्यात पोहोचणाऱ्या ८ पैकी ७ संघांची नावे निश्‍चित झाली आहेत. आता उर्वरित १ जागेसाठी २ संघाममध्ये लढत होणार आहे. आता सुपर-८ मध्ये पोहोचलेल्या संघांना प्रत्येकी तीन सामने खेळावे लागणार आहेत. यानंतर उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास निश्‍चित होईल.




आतापर्यंत भारत, ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, अफगाणिस्तान, वेस्ट इंडिज, यूएसए यांनी आधीच स्पर्धेच्या पुढच्या टप्प्यात म्हणजेच सुपर-८ मध्ये प्रवेश केला आहे. आता इंग्लंडचा संघ सुपर-८ मध्ये पोहोचणारा सातवा संघ ठरला आहे. तर, २० पैकी ११ संघांचा म्हणजेच पाकिस्तान, न्यूझीलंड, श्रीलंका, नेपाळ, युगांडा, पापुआ न्यू गिनी, नामिबिया, ओमान, कॅनडा, स्कॉटलंड आणि आयर्लंड या संघांचा पत्ता कट झाला आहे. आता एका जागेसाठी दोन संघांमध्ये लढत पहायला मिळणार आहे. यामध्ये बांगलादेश आणि नेदरलँडच्या संघांचा समावेश आहे.

## फलंदाजीसह दोन्ही हातांनी गोलंदाजी

। बंगळूरू । वृत्तसंस्था ।
क्रिकेटमध्ये फलंदाजी आणि गोलंदाजी करू शकणारे अष्टपैलू खेळाडू फार कमी आहेत. त्यातही एखादा खेळाडू फलंदाजीसह दोन्ही हातांनी गोलंदाजी करत असेल तर फारच नवल. असाच एक खेळाडू मध्य प्रदेशात आहे. सोहम पटवर्धन असे या ज्युनियर क्रिकेटपटूचे नाव असून तो फलंदाजीसोबतच दोन्ही हातांनी नियमित गोलंदाजी करतो. आता त्याच्या या विशेष क्षमतेची दखल बीसीसीआयने घेतली आहे. बीसीसीआयने बंगळुरू येथे आयोजित हाय परफॉर्मन्स कॅम्पसाठी सोहम पटवर्धनची निवड केली आहे.

# भारत विरुद्ध कॅनडा सामन्यात पावसाचा व्यत्यय

## दिग्गज संघाविरुद्ध खेळण्याच्या संधीला मुकले

। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।
भारत आणि कॅनडा यांच्यातील टी-२० विश्वचषकातील सामना पावसामुळे रद्द करण्यात आला आहे. मैदानाची पाहणी केल्यानंतर पंचांनी हा निर्णय घेतला. भारत विरुद्ध कॅनडा मॅच रद्द झाल्याने दोन्ही संघांना प्रत्येकी एक गुण देण्यात आला. हा सामना रद्द झाल्याने भारताला आणि कॅनडाला स्पर्धेतील पुढच्या फेरीतील प्रवेशावर काही परिणाम होणार नाही. मात्र, कॅनडा सारख्या नवख्या संघाला भारतासारख्या दिग्गज संघाविरुद्ध क्रिकेट खेळण्याच्या संधीला मुकावे लागले. सामना रद्द झाल्यानंतर कॅनडाचे खेळाडू कोहलीसोबत फोटो काढताना पाहायला मिळाले.




फ्लोरिडातील पूरस्थिती आणि पावसामुळे अमेरिका आणि आयरलँड यांच्यातील १४ जूनला होणाराही सामना रद्द झाला होता. हा सामना रद्द झाल्याने अमेरिकेने सुपर-८ मध्ये प्रवेश केला. तर, पाकिस्तानच्या संघाला टी-२० विश्वचषकाबाहेर जावे लागले. फ्लोरिडामध्ये झालेल्या पावसामुळे मैदान ओलं असल्याने शनिवारचा भारत विरुद्ध कॅनडा सामनादेखील रद्द करावा लागला. भारताचा साखळी सामन्यातील अखेरचा सामना जरी रद्द झाला असला तरी भारताने यापूर्वीच्या तीन सामन्यांमध्ये विजय मिळवल्याने सुपर-८ मध्ये प्रवेश केला आहे.

### भारताचे सुपर-८ मधील सामने

**भारताचा सुपर-८ मधील पहिला सामना अफगाणिस्तान विरुद्ध २० जूनला होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार हा सामना रात्री ८ वाजता सुरु होईल. भारताचा सुपर-८ मधील दुसरा सामना ङ्गडफ गटात दुसऱ्या स्थानावर असलेल्या संघाविरुद्ध होईल. ङ्गडफ गटातून बांगलादेश किंवा नेदरलँड सुपर ८ मध्ये प्रवेश करु शकते. ही मॅच २२ जूनला होणार आहे. तसेच, भारताचा सुपर-८ मधील तिसरा सामना ऑस्ट्रेलिया विरुद्ध होईल. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील मॅच २४ जूनला होणार आहे.**

# पात्रता फेरीत पुरुष संघांचीही निराशा

। तुर्कस्थान । वृत्तसंस्था ।
पॅरिस ऑलिंपिक स्पर्धेस पात्र ठरण्यासाठी असलेल्या अखेरच्या पात्रता फेरीत भारतीय तिरंदाजी पुरुष संघ महिलांप्रमाणे ऑलिंपिक कोटा मिळवू शकला नाही, त्यामुळे आता पॅरिस ऑलिंपिकमध्ये स्थान मिळण्याकरिता रँकिंगवर अवलंबून राहावे लागणार आहे.

भारतीय महिला संघाला काल युक्रेनविरुद्ध उपउपांत्यपूर्व फेरीत धक्कादायक पराभव झाला. त्यानंतर आज जागतिक क्रमवारीत दुसऱ्या क्रमांकावर असलेला पुरुषांचा संघ मेक्सिकोविरुद्ध शूटऑफमध्ये पराभूत झाला. या स्पर्धेत भारतीय पुरुष संघाला अव्वल मानांकन होते; परंतु आजच्या लढतीत त्यांची ४-५ अशी हार झाली.

पहिल्या दोन सेटमध्ये भारतीयांनी विजय मिळवत ४-० अशी आघाडी घेतली होती. तिसऱ्या सेटमध्ये बरोबरी त्यांना उपांत्य फेरीत स्थान मिळवून देणास पुरेशी ठरली असती; परंतु मोक्याच्या क्षणी गुण गमावले. मेक्सिकोने बरोबरी साधली आणि त्यानंतर शूट ऑफमध्ये विजय मिळवला.

## सामना रद्द झाल्यामुळे मिळाले शुभ संकेत

# भारत करणार इतिहासाची पुनरावृत्ती?

। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।
भारत आणि कॅनडा यांच्यातील सामना पावसामुळे रद्द करण्यात आला होता. हा सामना रद्द होणे म्हणजे शुभसंकेत मानला जात आहे. कारण, २००७च्या टी-२० विश्वचषकात भारत आणि स्कॉटलँडचा सामना रद्द झाला होता. त्या विश्वचषकात भारताने विजेतेपद पटकावले होते. भारतीय क्रिकेट चाहत्यांना १७ वर्षांपूर्वी ज्या प्रमाणे भारताने विजेतेपद पटकावले होते तशीच कामगिरी पुन्हा व्हावी, अशी अपेक्षा आहे.



भारतीय संघाने २००७ मध्ये महेंद्रसिंह धोनीच्या नेतृत्त्वात पहिला टी-२० विश्वचषक जिंकला होता. भारताची त्या विश्वचषकात पहिला सामना स्कॉटलँड विरुद्ध होणार होता. मात्र, पावसामुळे तो रद्द करावा लागला होता. भारताने यानंतर दमदार कामगिरी करत टी-२० विश्वचषक जिंकला होता.

### आयसीसी विजेतेपदाचा दुष्काळ संपणार?

**भारताने २००७ मध्ये दक्षिण आफ्रिकेत झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या अंतिम फेरीच्या लढतीत पाकिस्तानला पराभूत केले होते. २०११ मध्ये झालेल्या एकदिसीय विश्वचषकात देखील भारताने अंतिम फेरीच्या लढतीत श्रीलंकेला पराभूत केले होते. भारताने २०१३ मध्ये चॅम्पियन्स ट्रॉफीचे विजेतेपद मिळवले होते. त्यानंतर टी-२० किंवा एकदिवसीय विश्वचषकात भारताला विजेतेपद मिळवता आलेले नाही. जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताला सलग दोन वेळा पराभव स्वीकारावा लागला. भारताला २०२३ च्या विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात ऑस्ट्रेलियाकडून पराभव स्वीकारावा लागला होता. रोहित शर्माच्या नेतृत्वात भारत आयसीसी विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्यात यशस्वी ठरणार का, हे पाहावे लागणार आहे.**

# गंभीरच्या नावावर शिक्कामोर्तब

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।
टी-२० विश्वचषकानंतर भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड या पदावरून पायउतार होणार आहेत. यानंतर भारतीय संघाला नवीन मुख्य प्रशिक्षक मिळेल, ज्याची घोषणा जूनच्या शेवटच्या आठवड्यात होण्याची शक्यता आहे. हा नवा मुख्य प्रशिक्षक दुसरा कोणी नसून माजी सलामीवीर गौतम गंभीर आहे.

रिपोर्टनुसार, भारतीय संघाचा मुख्य प्रशिक्षक म्हणून गौतम गंभीरच्या नावाला मंजुरी देण्यात आली असून बीसीसीआय आणि गंभीर यांच्यात करारही झाला आहे. टी-२० विश्वचषकानंतर गंभीरच्या नावाची अधिकृत घोषणा केली जाईल. बीसीसीआयच्या एका सूत्राने सांगितले की, बोर्ड आणि गंभीर यांच्यात चर्चा झाली आहे. तो राहुल द्रविडची जागा घेणार आहे. तसेच, गौतम गंभीरने भारतीय संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची सूत्रे हाती घेताच केवळ सपोर्ट स्टाफमध्येच नाही, तर संघातही मोठे बदल होण्याची शक्यता आहे. गौतम गंभीरची कोचिंग स्टाईल राहुल द्रविडपेक्षा वेगळी आहे. द्रविड हा संयमी आहे. मात्र, गंभीर हा आक्रमक क्रिकेट खेळण्याला प्राधान्य देतो.



कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)